डॉ. नितीन मोरे



# ऐसी अक्षरे

# ऐसी अक्षरे..

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

## या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# ऐसी अक्षरे..

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# ऐसी अक्षरे..

लेखक: डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २३ डिसेंबर २०२१ (मार्गशीर्ष व. पंचमी शके १९४३ )

©esahity Pratishthan®2021

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत: आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे बत्तिसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

ऐसी अक्षरे..

## दोन शब्द

ज्यास क्षरावस्था नाही ते अक्षर. अशा अक्षय अक्षरांतून बनणारे शब्द, त्या शब्दांची वाक्ये, त्यातून परिच्छेद .. उतारे नि पाठ.. त्यातून पुढे लहान मोठे ग्रंथ. शब्दांना ओळख देणारे स्वर आणि व्यंजने.. त्यातून उभी राहिलेली ही जगाला दृष्टी देणारी शब्दसृष्टी.

'ऐसी अक्षरे..' हा एकेका अक्षरावरून लिहिलेल्या उताऱ्यांचा संग्रह आहे. 'अ' ते 'ज्ञ' मधील अक्षरांवरून सुरू होणाऱ्या शब्दांनी छोटे उतारे, त्या उताऱ्यांस आपला एक अर्थ असावा, त्यात त्या अक्षराचा नाद जाणवावा अशा पद्धतीने ऐसी अक्षरे मेळवित हा अनुप्रासाचा प्रयोग केला आहे.

डाॅ. नितीन मोरे

ऋणनिर्देश

एका अक्षरापासून सुरू होणारे शब्द शक्य तितके वापरून उतारे लिहिण्याची कल्पना सुचली तरी याबद्दल मनात साशंकता होती. ती दूर करून लिहिण्याला प्रोत्साहन देणारे ई साहित्यचे श्री.सुनीळ सां◌ंमत यांना या लिखाणाचे श्रेय द्यावे लागेल. त्यांचे आभार. अक्षर शब्दाची फोड समजवून सांगणारे प्रा.विजय काचरे सर यांचा ही मी ऋणी आहे.

डा◌ॅ.नितीन मोरे

अ.. आ.. इ.. ई.

## उस्मानाबादी

उस्मानाबाद तालुक्यातील एका भागाचा अपवाद वगळता उर्वरित भागाची उपेक्षा होत असल्याचा आरोप अपक्ष उमेदवार श्री.आश्विनराव अनंत अडसुळे यांनी प्रचारसभेत आज इथे केला. विरोधी उमेदवार आपल्याबद्दल खोडसाळ प्रचार करत असल्याचा आक्षेपही या सभेत त्यांनी घेतला. एका उपविभागाचा अपवाद वगळता इतर भागाचा आर्थिक विकास न होणे अतार्किक असून आज जाऊ तेथे खाऊ हा आजार एकदम उफाळून ऐरणीवर आला आहे. आपण या असाध्य आजारावर उपचार करण्यासाठीच ह्या 'उस्मानाबाद उत्थान समिती'ची स्थापना केली आहे. त्यातून विविध उपयुक्त उपक्रम आखण्यात येतील, अल्पावधीत अधिकाधिक रोजगार उपलब्ध होतील, आर्थिक आघाडीवर आगेकूच होईल, आपल्या मतदारसंघाचा अनुशेष भरून काढण्याचे विशेष प्रयत्न होतील. इतर उमेदवारांकडे असला कोणताही कार्यक्रम नाही, तेव्हा उस्मानाबादकर आपल्या उस्मानाबाद उत्थान समितीस केवळ उपचार म्हणून नव्हे तर तन मन धनाने साथ देऊन उपकृत

करतील असेही ते म्हणाले. इकडून निवडून येऊन जनतेच्या उपयोगी पडण्याचा आनंद काही और असेल आणि विरोधी उमेदवार श्री.उमेदसिंग यांच्या अघोषित अधिसत्तेचा अंत होईल तेव्हा उस्मानाबादकर आनंदोत्सव साजरा करतील असेही अडसुळे पुढे म्हणाले.

निवडणुकीची अधिकृत अधिसूचना निघाल्यानंतर इकडे झालेल्या अत्यंत छोटेखानी आणि अनौपचारिक समारंभात आज अडसुळेंनी आपली अस्वस्थता प्रकट करत उस्मानाबादची ओळख निर्माण करणे हाच आपला आग्रह असून यासाठीच आपला अट्टाहास असल्याचे अधोरेखित केले आणि ईश्वरसाक्षीने हे अखंड असिधारा व्रत अंगीकारण्याचे आणि अथक प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

ऋ

## ऋतुराज

वसंत ऋतूत मृगापाठी मृगयेसाठी धावणाऱ्या भृंगराज नृपाच्या दृष्टीस मृगाऐवजी पडली ती मृगनयना मृदुला. नृपती भृंगराज वृक्षराजीतून अश्वावर स्वार मार्ग काढत निघालेला. मृत्तिकेचा धुरळा पृष्ठभागावरून उडवत. मृगयेत नृपतीची दृष्टी नेहमीच एकाग्र असे, धृवताऱ्यासम दृढ. मृगयेपाठी तृष्णा नि क्षुधा यांची स्मृती नृपतीस राहात नसे. वृक्षराजी, त्यातून धावणारा मृग नि अश्वारूढ भृंगराज.. हे दृश्य सदा दिसत असे.

परंतु आक्रित घडले आज.. भृंगराजाची दृष्टी विचलित व्हावी असे दृश्य आज दिसले .. तृणपात्यांच्या दाटीत एका तटाकाजवळ सृष्टीचा चमत्कार म्हणावा अशी ती दृष्टीस पडली. निश्चल होऊन भृंगराज ते दृश्य पाहात राहिला. येथील वृक्षांची पर्णे आणि तृणपाती भृंगराजाच्या ओळखीची. त्यात ही मृगनयनी मृदुला याआधी दृष्टीस कधीच नाही पडली? पुढे निसर्गाने आपली किमया दाखवली .. दो हृदयी मृदू भावनांचा उदय झाला. शृंगाररसाने भृंगराजाच्या मृगयेचा वेध घेतला. वृक्षवल्लीत वावरणाऱ्या मृदुलेने भृंगराजाचे हृदय चोरले.

"नृपवर, एक कृपा करावी.."

"बोलावे मृदुले."

"आपण नृप असता ही कृपणता का असावी?"

"भृंगराज आणि कृपणता?"

"नृपवर.. आपण तृणाहारी निष्पाप जिवांची नृशंस हत्या थांबवावी. त्याबदल्यात हिंस्त्र श्वापदांची शिकार करून मृगयेची तृष्णा भागवावी. बृहद सृष्टीचे रक्षण करण्याचा दृष्टिकोन बाळगावा."

शृंगाररसाच्या परिणामाखाली भृंगराजाने मृगया सोडली. मृदू हृदयी मृदुलाच्या या स्पृहणीय कामगिरीचा तृणाहारींस पत्ता लागला असता तर नक्कीच ते सृष्टी रक्षणाची दृष्टी असणाऱ्या मृदुलेचे ऋणी राहिले असते.

वनवासिनी मृदुला लवकरच भृंगराजाची हृदयवासिनी झाली. मृदुंग नि सनई चौघड्यांनी, ऋषीमुनिंच्या साक्षीने ऋचा पठण करत दोघांचे स्वागत झाले. सृष्टीतील ऋतुराज वसंत भृंगराज-मृदुलेच्या आयुष्यातही फुलला..

अं

## अंगराज

अंबापुरीचा राजा, राजा अंगराजाचे अंतर्गत राजकारण म्हणजे कोणासही अंकित करून आपल्या अंकावर बसवून आपला अंमल प्रस्थापित करणे. अंगराज याबाबतीत अंमळ नशीबवान होता. कारण त्याच्यावर अंधविश्वास ठेवून त्याच्या आज्ञेत अंशभरही बदल न करता त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या सरदारांचा अंतर्भाव त्याच्या अंतस्थ वर्तुळात होता. अंगराजास अंतराय न देणारे सरदार अंतर्बाह्य अंमलदार म्हणावे असे होते. अंमलदार म्हणजे अंगदेशी अंगराजाचा अंमल प्रस्थापित करण्याचा अंत:करणापासून प्रयत्न करणारे. आले अंगराजाच्या मना असा अंगराजाचा कोणताही निर्णय अंतिम असे. राजाच्या अगदी अंतर्मनी असणाऱ्या हुकुमांना अंतर्यामी असल्यासारखे ओळखून हे अंमलदार कोणत्याही अंतर्गत बाबींची सबब न देता त्यांची अंमलबजावणी करत. या सर्व अंमलदारांत एक अंगभूत शहाणपण असावे. अंगराजाच्या आदेशांचा अंदाज त्यांना आधीच येत असे. अंगराजही आपल्या आदेशांना अंतर्मनाचा आवाज म्हणत असे. अंगराज कधी अंतर्मुख होऊन साऱ्या अंमलदारांना अंधारात ठेवूनही हुकूम देई. त्यातील काही अंगाशी येणारे असले तरी अंमलदार सर्व

आदेशांच्या अंमलबजावणीत अंतर पडू देत नसत. काही आदेश समजण्यास अंमळ कठीण असले तरीही अंतत: अंदाजपंचे अंगीकारत अंमलात आणले जात. हे सारे त्यांच्या अंगवळणी पडले होते. अवनी आणि अंबर या दोन्ही ठिकाणी अंगराजाचे अंतिम राज्य आहे व राहिल यावर त्यांचा अंधविश्वास होता. - असे असले तरीही अवनी ते अंतरिक्षातील प्रत्येक गोष्टीस अंत असतोच. अंमलदारांच्या अंतर्गत कुरबुरींना आरंभ झाला.. काही गोष्टी अंगराजास अंधारात ठेऊन होऊ लागल्या. काही अंमलदारांच्या अंगभूत धूर्तपणाने नि लबाडीने अंगराजाच्या अनिर्बंध सत्तेच्या अंताची सुरूवात झाली. अनपेक्षित घडामोडींचा अंदाज न आल्याने अंगराजाने अंथरूण धरले.

आणि अंतत: अंगराजाच्या सत्तेचा अंत झाला

क

## कायदा!

कमलाकर कालेलकर काकांच्या कामाचे कागद काकूंनी कातरीने कराकरा कापले, अगदी कापडी पिशवीसकट. कचऱ्याच्या कुंडीत ते टाकणार तोच काका कामावरून परत आले,

"का इतकी कावली आहेस कामिनी?"

कामिनी या कातरवेळी कारण नसताना अशी का कावली काकांना काही कळेना.

इतक्यात कावळा कोकलू लागला.

"कोण कडमडतंय?" कामिनीबाई करवादल्या

आणि कवाडातून करूणा कामत आत शिरली. कामिनीबाई तिच्याकडे कसनुसा कटाक्ष टाकून पाहू लागल्या.

"कामिनीताई, काय? कसली कामगिरी बजावल्यासारख्या बघताय?" हातातील कात्रीकडे कटाक्ष टाकत करूणा म्हणाली.

"करूणे, कधीची येणार म्हणून काकुळतीने वाट पाहात होते.. कामं आटोपली?"

करूणा म्हणजे कामिनीच्या काकाची कनिष्ठ कन्या, पण कामिनीच्या मैत्रीणीसारखी.

कमीतकमी करूणेसमोर तरी कामिनी काही करामती करणार नाही समजून कालेलकरांनी निश्वास टाकला.

"कात्री घेऊन काय करताय?"

"काय करणार? पोटाला कात्री लाऊन कालेलकरांच्या घरी आयुष्य काढले. कलह काही कमी होत नाही. घेतले ते करारपत्राचे कागद.. कापून टाकले. ना राहिला कागद.. ना होईल कलह."

गृह कलहाने कामिनीबाई इतक्या कावतील असे काकांना कधी वाटले नव्हते.

"कर्म आमचे! कमनशिबी आम्ही.. यांचा कनिष्ठ भाऊ, काशिनाथ. कुडमड्या भटजी. कोकणातील जागा द्यायला का कू करतोय. मी म्हटले, काय करायची जागा.. उगाच. कालेलकरांच्या कलहाला लावली कातरी.. आता यापुढे कलह नाही नि काही नाही. उगाच तब्येतीचे कमीजास्त झाले तर काय कामाची आहे इस्टेट?"

कामिनीबाईंच्या डोक्यात असे काही सुरू असेल असे कालेलकरांना कधीच वाटले नव्हते. आजकाल त्यांचे बीपी कमीजास्त होत होते हे खरे.. कामिनीबाईंनी त्यावर कायमचा कायद्यापलिकडला उपाय काढलेला पाहून कालेलकरांना कानकोंडे व्हायला झाले.

कुणीतरी काशिनाथाचे कान भरले, हलक्या कानाचा तो, कशाचाही विचार न करता कायदे विसरून कच्छपी लागला. कालेलकरांवर किटाळ आले. कामिनीकाकूंचा जीव कळवळला.

- नि त्यांनी कात्रीने करारपत्रे कापून कायदेशीर खेळच संपवला..

ख

## खेळ खल्लास!

खुरमांडी घालून खान खाली बसला की सगळ्यांची पाचावर धारण बसे. पित्त खवळले की खान खुरमांडी घालून बसायचा. आता खूनखराबा निश्चित हे साऱ्यांच्या ध्यानी यायचे. खान होताच तसा, खतरनाक खैरमोडे आणि खूंखार खान या दोघांची गँग खतरा गँग म्हणून ओळखली जायची. दोघे मिळून कोणालाही खोपच्यात घेऊन त्याची खाल उधेडायला मागेपुढे पाहात नसता. खूप वर्षांपूर्वी दोघे एका खानावळीत खाना खाताना भेटले, तिकडे कशावरून तरी खूनखराबा झाला नि खान आणि खैरमोडे एकत्र आले. आधी एकमेकांवर खार खाऊन असणारे दोघे आता खुलेपणाने एकत्र येऊन आपल्या एरियात खरेखोटे करत फिरू लागले. आणि खोत गल्ली, त्यातील शंभर खोल्यांसकट खान-खैरमोडेच्या खोलवर प्रभावाखाली आली. लोक त्यांच्या खोलीत न्यायासाठी खेटे घालू लागले. रात्री त्यांचे खेळ तिथे खुल्लमखुल्ला सुरू झाले. नागरिकांना खतरा गँगचा खतरनाक खौफ वाटू लागला. खाऊनपिऊन सुखी असणाऱ्या खोत गल्लीतील लोकांच्या झोपेचे खोबरे झाले, पण

कोणी ब्र काढला तर खान त्याची अशी खातिरदारी करे की त्याला खुदाची आठवण यावी.

अशा ठिकाणी खोली घेऊन खानोलकर रहायला आला. वरकरणी खाली मुंडी पाताळ धुंडी खानोलकर खरेतर खूप खट होता पण खोलीबाहेरील खाटेवर आकाशातील खग निरीक्षण करत तो नुसताच पडून असे. खान खैरमोडेंच्या कारवाया बघताना त्याचा जीव खालीवर होत असे. खैरनार त्याला खुळचट समजे तर खान त्याला खुळा समजून दुर्लक्ष करी नि खानोलकर मनातल्या मनात खवले बाहेर काढून या दोघांचा खुळखुळा करण्याची योजना बनवे.

एके दिवशी खानोलकर उठला, खोल्याखोल्यांतून खान-खैरमोडेंविरूद्ध पत्रके गेली. खान गँगविरूद्धात लोक खुसुखुसू बोलू लागले. खानोलकराची खुसपटे खतरा गँगला खुपण्याआधीच आपल्या खाटेवरून खानोलकर खर्जातील आवाजात खतरा गँगविरूद्ध असा बोलू लागला की खुद्द गँगस्टरना येऊन खबर घ्यावी लागली. खानोलकरचा प्लॅन खराखुरा सफल झाला. वेशांतर करून आलेल्या सबइन्स्पेक्टर खानोलकरच्या खेळीमुळे खतरा गँग नि खान-खैरमोडेचा खेळ खलास झाला नि खोतगल्लीत परत मोकळे वारे खेळू लागले.

# ग

## गफूरगँग

गफूरचाचाला गाणी गुणगुणत गुन्हा करण्याची सवय आहे. गवईच जणू. गफूरचाचाला गुन्हेगारीत गलथानपणा खपत नाही. गचाळपणा करणारा कोणी असो, त्याची गचांडी धरल्याशिवाय तो सोडत नाही. त्याच्या त्या गुरकावण्यामुळे भल्या-भल्यांची गाळण उडते. कुणी कितीही गुडघ्यावर बसून गयावया करो, गफूर-चाचा गप्प बसत नाही..

गफूरचाचा तसा गफूर नाही नि चाचा ही नाही. तो खरा गोपीनाथ गायकर म्हणजे गोपू.. वयानेही चाचा नाही, तर गद्धेपंचविशीतला. पण त्याच्या वागण्याने नि गुणांमुळे त्याला गफूरचाचा म्हणायचे सगळे. गफूरचाचा त्या गावातील गवळी. गवळी असल्याने गावभर संचार. कुठेही गोंधळ झाल्याचा ग्रह झाला की गुरकावून अंगावर येणारा.. गुस्ताखी माफ न करणारा. त्याच्यासारखे गुण उधळणारा गोपू.. खरेतर गब्बरसिंग म्हणवायचा, पण गावातच असा आदर्श असताना दुसऱ्या कोणाची गरज काय? त्याच्या गोटात तो गफूरचाचा म्हणवला जाऊ लागला. गोपू हातात गदा धरल्यासारखी काठी घेऊन गिर्रेबाज चालीने गुरकावत गस्त घातल्यासारखा गर्जना करत चालला की गावातील गुरख्यांना पण गप गुमान सलाम ठोकण्यावाचून गत्यंतर नसे.

गोव्यातल्या गीतापूर गावातला गोलकिल्ला म्हणजे गोपूचा गड. गोलकिल्ल्यातील त्याच्या गोटातील गणंगांना गोपू ऊर्फ गफूरचाचाच्या गुणांचे कोण कौतुक. या गोलकिल्ल्यातच गोपू गँगची गहन खलबते होत. दहशतीची गणिते मांडली जात. गावातील गब्बर असामींना गोड गोड बोलून गुंतवणे नि नंतर गदागदा हलवून लुटणे हा गँगचा गोरख धंदा होता. त्या लुटीतले काही पैसे गरीबांघरी गेले की तेवढे गुडविल गँग कमावून ठेवत होती. गरिबांना गोपू आपला वाटला की गँगची गाडी जलद गतीने रूळावर धावेल हे गोपूचे गणित होते. आणि याबाबतीत तो आपला गुरू गफूरचाचाला मागे टाकून पुढे गेला होता..

गफूरचाचाचे दिवस जिथे फुले वेचली तिथे गोवऱ्या वेचाव्या असे आले.. गोपू गँग मात्र अजूनही गफूरगँग म्हणूनच गणली जाते!

घ

## घरोघरी

पहाटे पहाटे घराघरातून जात्याची घरघर ऐकू येई. घरोघरी जात्यावर दळणे दळली जात. घाई नाही नि काही नाही. घरट्यातून चिमण्या उठत. घारीपासून पिल्लू सांभाळण्याचा घोर त्या चिमुकल्या जीवांच्या मनात घर करून असे. घोरत पडलेली पोरं आणि थोरं उठली नाहीत तर आया पोरांना पाठीत धपाटे घालत. व्रात्य पोरांना सांभाळताना कधी घायकुतीला येत, पोरं घाईघाईने उठून घटाघटा दूध पीत नि घाटावर अंघोळ करायला जात, मग घोट्यापर्यंत ओले पाय घेऊन घरी आले की आया घरात घाण आणून घोळ घालू नका म्हणून ओरडत. घटस्थापना झाली की घरोघरी हेच घडताना दिसे. दिवाळी दसरा हातपाय पसराचा घोष होई. दिवाळीचा किल्ला बनण्याचे घाटत असे. घबाड सापडल्यासारखी घाटावरची माती घमेल्यातून आणून घडवंचीवर घातली जाई नि मग घिसाडघाई न करता घाम गाळून घडाघडा गाणी टगात किल्ला बनवत. त्यावर चढणारी घोरपडही लावत. घोड्यावर स्वार संताजी घोरपडेही किल्ल्यावर तलवार घेऊन उभा असे. घराघरातून घरगुती फराळाचा घमघमाट घ्राणेंद्रियांना स्पर्श करून जाई. बायका शेव

चकल्यांचे घाणे पाडत तेव्हा पोरं घरात घिरट्या घालत घुटमळत नि आया घारीसारखी नजर ठेऊन असत. दिवाळीचे चार दिवस घडामोडींनी भरलेले असत. रांगोळ्या घातल्या जात. देवळाच्या घुमटावर आरास असे. पोरं दोन घास खाण्यापुरते घरात असत. बाकी घराबाहेर. फटाक्यांच्या आवाजात कुठे लुटुपुटीच्या घमासान लढाया लढल्या जात. लक्ष्मीपूजनाला घरोघरी केरसुण्या येत. माहेरपणाला आलेल्या बहिणी भावाला ओवाळून गोडाचा घास भरवत. दिवाळीच्या निमित्ताने घारापुरीचे चार दोन गोड घास सर्वांच्या घशात उतरत. घरोबा असणाऱ्या शेजाऱ्यांच्या घरी फराळाची ताटे जात. घसघशीत दिवाळी बक्षीसाच्या आशेने पोस्टमन घरदारे पालथी घालत. कोणी देण्या घेण्यावरून सासुरवास होणारी आईकडे आपली घुसमट सांगत बसे, संसारात घर्षण कोणाला चुकलेय म्हणून आई समजूत घालत बसे..

घुटमळणारे पाय नि मने आवरत नि सावरत मुली सासरच्या घरी निघत. चार दिवसांत दिवाळसण संपला की घरोघरी पुढील दिवाळीची वाट पाहणे सुरू होई..

च

## वाडा चिरेबंदी

चौकातील चौकीत चौकशीसाठी चार चोरांना पकडून आणले गेले. चैत्र चतुर्दशीच्या दिवशी भर चंद्रप्रकाशात चांदणी चौकातील चर्चच्या बाजूच्या वाड्यातून काही किंमती चिजा चोरी झाल्या. पोलिसांच्या सुरक्षेला चिरून आणि भिंतीत चीर पाडून चिरेबंदी वाड्याच्या चिरा चोरांनी निखळवल्या.

चौकाचौकातून निदर्शने होऊ लागली. चॅनेलवाले चुप बसणार नव्हतेच. चेंगट चॅनेलवाल्यांनी लागलीच चांगल्याच चर्चा घडवून आणल्या. एक चिमणीही चोच मारू शकणार नाही अशा बंदोबस्तात चोर चोरी करतो कशी? चर्चेचे चावून चावून चोथा होईल इतके गुऱ्हाळ चालले. अशा चर्चेतून हाती येतात तशी चिपाडेच निघाली का? नाही, कमीतकमी चेहरा न लपवण्यासाठी तरी चांदणी चौक पोलिसांना चतुराईने वागावे लागले. चॅनेलीय चर्चेत चेंडू जास्त कोणाच्या बाजूस टोलवता येईना. पोलिसांची चिंता वाढली. चौकशी चित्त्याच्या चपळाईने केल्याचे दाखवत चार दिवसांत चार चोरांस चौकशीसाठी चटचट चतुर्भुज करावेच लागले. चतुर पोलिसांनी दोन आणि दोन बरोबर चार असे गणित मांडत चोरीचे चार बिंदू

जोडत चार चोरांची गचांडी धरली. चौघांना चेहरा झाकून चौकीत चौकशीसाठी आणले गेले. चर्चा करून चॅनेल थकले नव्हते, पण चर्वितचर्वणासाठी तोवर नवीन विषय मिळालेला. त्यामुळे ही चांदणी चौकातील चोरी मागे पडली. चॅनेलीय आघाडीत या चोरीबद्दल चिडीचुप्प शांतता झाली. चार आठ दिवसांत लोक ही चोरीबद्दल सारे विसरले. यथावकाश चारी चोर सुटले. चोरीचा मामला विसरला गेला. चिरेबंदी वाडा निखळलेल्या चिऱ्यांसकट तिथेच तसाच उभा आहे!

छ

## छत्रे छाया .. छाया छत्रे

छगन छत्रेच्या छत्रीतून छाया जाताना दिसली नि सगळे छत्र्या सारून छिद्रान्वेषीपणे पाहू लागले. काही छद्मी हसले. काही छी थू करायच्या संधीची वाट पाहू लागले. काही छद्मीपणाने छान म्हणाले. छाया म्हणजे छबूताईची छानसी छोकरी. छत्रेंचा छोटा छोकरा छायाला घेऊन फिरतो, तो ही लपून छपून नव्हे .. एवढी त्याची छाती? त्याच्या ह्या उद्धटपणास छेद द्यायलाच हवा. ह्या छोट्या लोकांनी मोठाच छळ मांडलाय.. छोटी जात नि छानछोकीची स्वप्ने? कोणीतरी यांच्या वस्तीवर छापा घालायला हवा.. स्वतःस छैलछबिला समजणारा हा कोण छोरा? छगन त्याच्या बापाची छाप. छत्रसाल छत्रे. निडर. बापाचे छत्र नि छप्पर गेले पण हा तसाच. पण म्हणून छायाशी सूत जुळवतो? याचे पंख वेळीच छाटले पाहिजेत. यानेच चांगल्या घरच्या छोकरीस छेडले असणार. छे.. यास छर्ऱ्याने उडविले पाहिजे. याच्या छाताडावर चार छड्या बसतील तेव्हा या छोट्या लोकांचे डोळे उघडतील. स्वतःला छावा मानतो.. छट, यांची छाटणी केलीच पाहिले .. आणि याची हिंमत झाली कशी याचा छडा लावलाच पाहिजे.. ही पाळेमुळे आताच छाटली पाहिजेत .. असले

छप्पन पाहिलेत.. नाना लोकांच्या नाना छटांच्या प्रतिक्रिया .. त्या असल्या छापाच्याच असणार .. छगनला ठाऊक होते.. पण तो ही छत्रसाल छत्रेंचाचा छोरा होता.. त्याने छत्री बाजूस सारून छबीदार छायाच्या खांद्यावर छानपैकी हात ठेवला.. काढा हवी तितकी छानदार छायाचित्रे म्हणत .. लोक चपापले .. छप्पन इंच छातीच्या छत्रेंच्या छोट्या छोऱ्याशी भिडण्यासाठी लागणारी हिंमत.. अगदी छटाकभरही कोणाकडे नव्हती..

-शेवटी एक दिवस छाया छापीकर, साऱ्या विरोधास छेदून छाया छगन छत्रे झालीच..

ज

जाऊ बाबा जोशात ..

जनार्दन जांगले : जमदग्नी, जग हे असंच असतं.. जीव गेल्यावर जाग येते जगाला.. जिवंत माणसाला जनावराइतकीही किंमत जग देत नाही ..

जमदग्नी जगताप : जना, तू म्हणतोस ते जाणवते मला. जगातल्या कित्येक जणांना जाणीव नाही.. जमानाच असा आलाय.. त्या जितेन्द्र जोगने नाही का..

जनार्दन : जोग? जोग नाही, शहाजोग तो. जास्त बोलू नकोस.. नाव जितेंद्र .. हाती जस्ताचा वाळा. जळो जिणे लाजिरवाणे .. ज्योतिषाने सांगितलेय..

जमदग्नी : ज्योतिषाचे काय काम? ज्याचे जळते त्याला कळते.. जना.. जनाबाई .. नाही जनाभाई.. जातीचा खडूस तो. जास्त न बोललेलेच बरे. जो आणि जो.. अगं अगं जोग आणि जोशी .. मला कुठे नेशी म्हण.. जंगली जोग आणि जाड्या जोशी .. ही जोडगोळी जास्तच डेंजर.

जनार्दन : जोडगोळी? जोड्याने जोरदार मारले पाहिजे कुणीतरी दोघा जणांना. तू जप. जिवाला जपून रहा. जातीचे धोकादायक ते. तो जोग आपल्या जटा सावरत नि जिराफासारखी मान वाकवून ज्यात ज्यात तोंड खुपसत असतो. जोखीम रे दोघांबरोबर काम करायचे. जम बसेपर्यंत जाम टेन्शन ..

जमदग्नी : जना.. तुका जाम काळजी. पण आपण जिगरबाज. तो

जितेन्द्र तर मी जितेंद्रिय .. त्यांच्या जवळ फिरकायचे पण जादा लक्ष द्यायचे नाही.

जनार्दन : जमा, खरंय. तुझ्याकडे जमा खूप काही आहे. जो आणि जो ची जन्मापासूनची अंडीपिल्ली सारी जाणतोस तू ..

जमदग्नी : ती आता जुनी झाली. जोग्याला नाही जोगवा मागत फिरायला लावला तर नावाचा जमदग्नी नाही. जन्मभर आठवण काढत फिरेल.

जनार्दन : जिरवशील तू. जाड्या जोशाची खोडही जरा जिरली पाहिजे. जमा, जोगचे जावळ जन्मापासूनच असे जटांसारखे असेल का रे? जटावाला जटायू.. जटा पकडून त्याला जमिनीवर आणलं पाहिजे. जर्जर करू दोघांना .. जरा जर्जर..

जमदग्नी : जाऊ दे रे.. जाऊबाई जोरात.. तुला माहितीय.. जोगीण नि जोशीण.. दोघी जाऊबाई आहेत.. एकमेकांच्या जाया..

जनार्दन : जमा, खरंय तुझे.. जाऊबाई म्हणतात जाऊबाई जाऊ जोरात .. त्या जोरावर जोग नि जोशी जोरदार जोश दाखवून घेतात..

जमदग्नी: जना, जोखून आहे मी यांचे पाणी. यांना जायबंदी करून जन्मभरची अद्दल घडवेन.. भले जामिनावर सुटका होवो की जन्मठेप.. जो आणि जो..

जनार्दन : यांना बाळा जोजो रे करून जोजवून टाकू.. चल..

जाऊया. बाकी तुझ्याकडे सगळा जामनिमा मस्त..

जमदग्नी : जामनिमा.. जास्तीत जास्त जामनिमा.. तू जपून जा.. माझ्या घरी जया बोंबलत असते.. तू मात्र जप..

जनार्दन : जातो रे जपून.. जपानला जातो.. जोग आणि जोशाचा जप करत.. जोशात .. जपानला.. कारण माझा जूता है जपानी ..

जमदग्नी : माझा पण जूता जर्मनी.. चल.. जाऊ बाबा जोशात..

झ

## झोपडी

वडाच्या झाडाखाली झावळयांची झोपडी झटपट बांधून झाली. झावबाने झोकात उभ्या राहिलेल्या झोपडीकडे नजर टाकली. झाड मोठाले त्यामुळे झोपडीत उन्हाच्या झळा येणार नाहीत नि हवेच्या झुळुकाही येत राहतील. झाडाझुडपात नाहीतर किती दिवस काढणार तो? इतके दिवस झाले, झोपायला झाडाचा बुंधा उशाला होता. पण झोपडी असली की निवारा मिळेल. त्यादिवशी झाडावरून साप झपकन उतरला.. नि झावबा झोपेतून जसा जागा झाला. झरकन सापाकडे नजर टाकली नि झटकन निर्णय झाला. झपाझप जाऊन झावळया गोळा कराव्या नि झावळयांची झोपडी झटाझट उभारून टाकावी. झऱ्याच्या काठी वडाच्या झाडाच्या पारंब्या झोपाळयासारख्या लोंबत होत्या. खाली झुकलेल्या पारंब्यांचा आधारासाठी वापर करून झावबाने झावळया लावून चारीबाजूने झाकून टाकले. उघड झाप करायला एक झावळी दरवाजा म्हणून लावली. भांड्यावर झाकण ठेवावे तशा दोनतीन झावळया छप्पर म्हणून लावल्या. रात्री येणाऱ्या झिळमिळत्या

चंद्रप्रकाशात छप्पर झुंबरासारखे चमकेल.. विडी चा झुरका घेत तो म्हणाला.

"झावबा, झोपडं झकास हाय जनू.."

झिमरलाल झोपडीजवळ येत झावबाकडे पाहात म्हणाला. झावबाला झिमरलालचे झोकांड्या खात येणे अजिबात आवडत नसे. नव्या झोपडीत झिमरमल असा झोकून येणार.. झिमरलालला चुकवावे कसे?

"झोपडं झकास चमकतंय.. पन पानी झिरपनार.."

झावबा म्हणाला. झावबाला झिमरलालची सवय ठाऊक होती. झिमरलाल झोपडीतले दोष शोधण्याआधी झावबाच बोलता झाला.

"झाले.. बोलून झाले?"

"झिमर, तू असा झोकांड्या खात येतो .."

"झाले? बोलून झाले? पन हे झोपडं अर्धीमुर्धं हाय बाबा.."

"का? झापं लावलीत की सगळीकडे.."

"झापांनी झोपडं व्हतंय व्हय रं? आता झटाझटा त्या गंगी झिपरीला झोपडीत आन. दोन झिपऱ्या केसांची झील व्हतील.. त्यांची झबली वाळत पडतील.. तवा झ्याक वाटल झोपडं.."

झिमरलाल निघून गेला.

झावबा झोपड्याच्या आत पाहात म्हणाला, "झिमरलाल.. झोक जात असंल तुझा.. पण हे मात्र झ्याक बोलला की!"

## ट

### टाकाऊ

"एक टाका टाकून शिवून टाक.."ती म्हणाली.

"असा टकमक का पाहतोयस? टीप तर मारायचीय."

तो खरेतर टरकतो. ती अशीच त्याला टोकायची. उगाच टगेपणाचा आव आणला तरी तिचे न ऐकण्याची टाप नव्हती त्याची. तिचा आवाजच असा टोकदार होता. तो तिला टरकावण्याचा विचार करायचा.. टरकावणे सोडून नुसताच टरकायचा. त्याच्या टारगट मित्रांची टोळी त्याची टर उडवायची, टिंगल करत टोपी उडवायची, टांग खेचायची. तो ही टकाटका अगदी टोकाचा विचार करायचा.. तावातावाने उभा राहायचा आणि दरवाजावर तिची टकटक ऐकू आली की टरकून टेबलखुर्चीवर टेकायचा. ती शिवण टिपण करायची.. संसाराची गाडी टुकुटुकू चालवायची. फार पूर्वी तो टांगा हाकायचा. टांगेवाला म्हणायचे टारगटपणे लोक, पण दुर्लक्ष करून घोड्यांच्या टपटप टापांत खूश असायचा. रिक्शांची टूम निघाली नि टांगे बंद पडले. संसाराला टेकू म्हणून ती काम करायची तेच आता टिकून राहिले. बेरोजगार तो टरबुजासारखा बुजून बसू लागला. ती टुकीने घर चालवायची. एकेकाळी टग्या

असणारा तो आता टेकीस आला. जाणारेयेणारे त्याच्या रिकामपणावर टिप्पणी करू लागले. त्या टिंगल उडवण्याने आत्मविश्वासा-चा एकेक टवका जणू उडू लागला. तो शिवण टिपणात हाताने टाके घालण्यापुरता उरला. एकेका टाक्यासह त्याच्या ओठांवर जणू टाके पडू लागले. ती सारे टुकीनं करत होती पण हळूहळू तिचे बोलणे टोकदार होऊ लागले .. नि कधी ते तसे नसले तरी त्याला टोचू लागले. हाताला काम नसल्याची टोचणी बरोबर होतीच.. दिवसभर टकामका टेळहणी केल्यासारखे पाहात राहाणे.. याहून दुसरा उद्योग उरला नाही .. बेरोजगारीने टिकाऊतून जणू एक टाकाऊ कोणी घडवला..

ठ

## ठमाकाकू

ठमाकाकू आमच्या
वय वर्षे साठ
कणा पाठीचा
अजूनही ताठ

ठमाकाकू तशा
शरिराने लठ्ठ
मनाने ॲलर्ट
म्हणू नका मठ्ठ

समजती काकू
स्वतः तरणीताठी
चालती तुरूतुरू
हाती नाही काठी

नवनवीन करीत
रोज पूजा पाठ
पोथ्या न पुराणे
त्यांची तोंडपाठ

पिकले पान तरी
म्हणती हिरवा देठ
एका साडी साठी
घालू पालथी पेठ

शिस्तीच्या कडक
नियम सत्राशे साठ
समजती इतरांना
अगदीच माठ

धरती वेठीस कोणासही
ठमाकाकूंशी गाठ
कांकु कुणी न करावे
काकू सोडती ना पाठ

ठणाणा करती काकू
कोणी न ऐके त्यांचा पाठ
ठणठण ओरडून ओरडून
जीभ ही झाली राठ

ठमाकाकांची त्यांच्याशी
ठकाठका पडलेली गाठ
होते लव्हमॅरेज त्यांचे
कोर्टशिप वर्ष आठ

कुणी म्हणत काकू खाष्ट
घेऊन हाती येत लाठी
सहानुभूती पार मनी
फार ठमाकाकांच्या साठी

घाबरती सारे त्यांस
काकू लागती पाठी
पाठीमागे म्हणतात सगळे
काकू, साठी बुध नाठी!

ड

## गडबड गडबड!

काही गडबड
थोडी खडबड
उगाच लुडबुड
उगाच बडबड

लपून अडनीड
करतो तडफड
येता उंदीर
घाबर तडफड

रागे भरली खडखड
डोळे फडफड
रागे कडकड
बिजली तडतड

उंदीर उंदीर
करतो ओरड
कशास तिकडे
करतो धडपड

म्हणून हडहड
म्हणते झडझड
होई धडधड
लपतो अडनीड

बापरे उंदीर
लोळे गडबड
आई वाचव
करतो कुडकुड

हाती घेऊन
काठी जडजूड
उंदरापाठी धावे
करीत बडबड

बाळा नकोस
करू रे रडरड

उंदराला मी
करते हडहड

राग विसरुनी
आई लाडलाड
बाळ खुदकन
हासे लडलड

## ढोलकिया!

ढमढेरे आणि ढवळे कंपनीचा ढेरपोट्या काळाढूस

मॅनेजर ढोलकिया ढांगा टाकत बाहेर पडला की मागे सारे ढँटढॅण म्हणत खूश होत. ढोलकिया म्हणजे खडूस, सगळ्यांना ढ समजणारा. कामगारांना काम दिले की ढिलेपणा अजिबात नाही. ढास लागो किंवा ढोमणं किंवा ढोपर फुटो, पण ढोलकियाला ढिलाई चालत नाही. तो दिलेल्या आॅर्डरपासून ढळत नाही. ढोलकिया कामाचा ढीग उभारे नि त्याचा आवडता ढोकळा खाऊन नि चहा ढोसून ढेकर देत बाहेर पडे. पक्ष्याने ढोलीत बसावे तसा केबिन मध्ये ढाराढूर झोपे. मग कोणी काही म्हणो तो ढिम्म हलणार नाही. पाठीमागे कामगार त्याला ढेप म्हणत नाहीतर ढोल. त्यासाठी त्याची चालण्याची ढबच कारणीभूत होती. तो ढिले नि ढगळ कपडे घालून चालला की एखादा ढोल चालल्यासारखा वाटे. तो आपल्या ढोलीत शिरला की ढोबळमानाने दोन तास ढाराढूर झोपे. तेवढा वेळ कामगार त्याचा मोबाईल ढापून त्यावर ढळढळीत सिनेमा बघत बसत नि ढोलकिया उठला की कामाचे ढोंग करत. अर्थात कामगार कामचुकार होते असे नाही पण ढोलकियाचे ढिसाळ काम त्याला कारणीभूत होते.

अशा ढोलकियाची बदली ढाक्याला झाली, एकाएकी आकाशातून ढग निघून जाऊन ढगाळ आकाश निरभ्र व्हावे तसे कामगार खुश झाले.. अगदी ढणढण ढोल पिटायचेच बाकी होते जणू. ढोलकियाच्या नंतर आलेल्या ढकांबेकरांनी मात्र ढिसाळ कारभार सुधारला. उगाच जुन्या गोष्टींची ढाल बनवून कारणे न देता. इतका की, आता ढमढेरे आणि ढवळे कंपनीचे कामगार ढकांबेकरांचे ढोल पिटायला लागले!

## ण

### कांकण भर..

कांकण किणकिण रूमझुम पैंजण
मंजुळ बोलणं भाळी गोंदण
झुळुक जणू आली रुणझुण
वाटत खुशीचे कणकण कणकण
आली जेव्हा वाटे तो क्षण
नशीबवान तो आहे एक जण
वाटे जणू तो आहे एक सण

येई आता करित तणतण
मागे माझ्या लावीत भुणभुण
येता जाता अडचण अडचण
अडचणींचे वाजवी तुणतुणं
इकडेतिकडे पैशांची चणचण
करवादित ती मणभर भणभण
उडवीत माझी दणदण दणदण

ऐकून घ्या ही गोष्ट पुराणी
आता उरली एक विराणी

आता उरले जीवनभर वण
संसाराचे जाहले जणू रण!

## तारक तृप्ती

तो तसा तिखट म्हणावा असा स्वभावाने खट. तिरसट, तिरपागडा. त्याला बघताच कोणालाही डोक्यात तिडिक येईल. त्याची बोलण्याची हातोटी अशी की टाकीची तोटी अर्धवट बंद असावी नि त्यातून जोरदार तोय वहावे. तिरकस बोलण्यात तरबेज. त्याचे तलवारीसारखे तीक्ष्ण शब्द, त्यात तापट डोके, तामसी, ताठर स्वभाव. तिरिमिरीत तो ताठा दाखवत कधी तुसडेपणाने लोकांना तोडून टाकत बोलेल हे त्यालाही सांगता यायचे नाही. अशा तिरपागड्या तारक तिरोडकराचे नाव खरेतर मारक तिरोडकर असायला हवे. पण तेवढा विचार कोण करतो? आणि त्याच्या बारशाच्या तिथीच्या वेळी त्याच्या तोंडवळ्यावरून तो तरूणपणी तसा होईल हे कोणास कसे ठाऊक असणार होते? तनाने तंदुरूस्त तो आपल्या तंद्रीत असे तेव्हा ठीक. पण ती तंद्री तुटली की त्याच्या नादुरूस्त मनातून नि तासलेल्या जिभेतून तासन तास तिरकस शब्द बाहेर पडत. कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त इजा हे तंत्र त्याने आत्मसात केलेले. कसलेही तारतम्य न ठेवता तो त्यांचा वापर करीत असे. तीन घावात तीनशे तुकडे करावेत असे त्याचे ते वागणे. तत्पूर्वी त्याच्यात तात्पुरते तरी बदल घडवण्याचे प्रयत्न त्याच्या मित्रांनी केलेले .. पण तो ताकास तूर लावू

देईल तर.. जित्याची खोडच ती.. त्यामुळे असा तारक तिरोडकर तिच्या येण्याने बदलेलच .. असा स्वप्नातही कोणी विचार केला नसेल. ती म्हणजे तृप्ती तुपे. श्री. तुकाराम तुपेंची तरूण तेजतर्रार कन्या, तृप्ती. तारकच्या आयुष्यात तिचा शिरकाव तारकच्या मित्रमंडळींनी शिताफीने करवून दिला.. तेव्हा ते जणू तिच्या करामतीची वाट पाहात असावेत .. तृप्ती तुपे सारे ठाऊक असूनही या तापल्या निखाऱ्यावर फिदा होती. तेव्हा तत्परतेने त्यांनी तृप्तीचे तात्काळ स्वागत केले. तृप्ती आपली तन दुरूस्त मन दुरूस्त कन्सल्टिंग सर्विस चालवते. तिचे याबाबतीत स्वतः बनवलेले तोडगे आहेत. स्वभावाच्या तुरूगात कैद झालेल्या तुरूंगवासियांना स्वभावाच्या शृंखला तोडून मुक्त होण्यासाठी ती उपचार करते. तिच्या तोडग्यांना तोड नाही, नुसते तोंडदेखले तात्पुरते इलाज नाही तर तिरसट नि तिरकस स्वभावाला तडीपार करण्याबद्दल तिची ख्याती आहे. म्हणजे तारकच्या मित्रांनी तिची तरफदारी करताना तिची तशी तारीफ ऐकवलेली.

तेव्हा तृप्ती आता कशा तऱ्हेने तारकला नमवते याबद्दल सगळयांना उत्सुकता होती.

तृप्ती आली.. तिने पाहिले .. तिने जिंकले .. म्हणजे खटासी व्हावे महाखट.. तिरसटाशी महातिरसट.. असे काही. तृप्तीसारख्या तरूणीचा तारकच्या आयुष्यातला प्रवेश म्हणजे देव तारी.. त्यास कोणीही उद्धारी सारखा होता. आपल्याहून तिखट तिरसट तिरकस अन तिरपागडे कोणी असू शकेल यावर तारकचा तसा विश्वास बसला नसता. पण तृप्तीच्या त्या तिरसट

गोष्टी तारकला तिच्या अदा वाटाव्यात .. त्यातून त्याच्या दिलाच्या तप्त तख्तावर ती थाटात विराजमान व्हावी..

तारकच्या मित्रमंडळींचा तो पूर्ण प्लॅन तसा यशस्वी झाला. तीर निशाण्यावर लागला. तृप्तीची ती कामचलाऊ कन्सल्टिंग सर्विस त्यानंतर त्या एकुलत्या क्लायंटनंतर गुंडाळली गेली. तारकच्या तिरसटपणावर तोच उपचार झाला. तृप्तीचा अति तिरकसपणा पाहून तारक तीन ताड उडालेला. पण त्यास घाबरून त्यानंतर तारक सुधारला.. तृप्तीला तारकची आस होती. त्या आसेच्या तापल्या तव्यावर तारकला सुधारण्याची पोळी तब्येतीत भाजून घेतली गेली. मनाच्या तुरूंगाच्या शृंखला तटतट तुटल्या.. नि तृप्तीच्या प्रेमाच्या तुरूंगात तारक तेव्हापासून कैद झाला.

त्र

## त्रावणकोरी

त्रावणकोर येथून हाती आलेल्या त्रोटक वृत्तानुसार त्रावणकोर महापालिकेच्या सर्व लढती त्रिकोणी होण्याची शक्यता आहे. त्रावणकोरमधील स्थानिक पक्षाच्या स्थापनेमुळे निवडणुकीस त्रिमिती प्राप्त झाली असून त्यामुळे त्रेसष्ट जागांसाठी होणाऱ्या महापालिका निवडणुकांकडे त्रावणकोरी जनतेचे लक्ष लागले आहे. निवडणूक व्यवस्थेत काही त्रुटी असल्यास त्याचा त्रास सामान्य त्रावणकोरवासियांना होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन नवीन त्रावणकोर रक्षण पक्षाने केले आहे. जनता त्रस्त असून तिला अजून त्रास सहन करण्याचे त्राण नाही, त्यामुळे जनतेचा त्रिवार पाठिंबा मिळून त्रावणकोर त्रिभुवनात प्रसिद्ध होईल असेही सांगण्यात आले. बाकी पक्षांची त्रेधा होऊन त्यांचा त्रिफळा उडवण्यात आपला पक्ष यशस्वी होईल असे प्रवक्ते श्री.त्रिभुवनानंद त्रिपाठी त्रावणकोर टुडेशी बोलताना म्हणाले. विद्यमान त्रावणकोर जनता पक्ष हा सत्ताधारी पक्ष एक त्रिकूटाने चालवलेला असून त्या त्रिमूर्तींमुळे जनतेस कोणी त्राता उरलेला नाही. त्रिशूळ या निशाणीवर त्रावणकोर रक्षण समिती सर्व त्रेसष्ट जागा लढवणार असून त्यापैकी त्रेपन्न

जागा आम्ही जिंकू असेही त्यांनी सांगितले. या निवडणुका त्रिपुरारी पौर्णिमेनंतर होतील असा अंदाज आमचे वार्ताहर त्रिंबकराव तिरपुडे यांनी वर्तवला आहे. त्रावणकोर महापालिका क्षेत्र हे त्र्याण्णव हजार किमी त्रिज्येच्या त्रिभुज परिसरात पसरले असून आता त्रावणकोरात त्रिशंकू स्थिती झाली तर सत्तास्थापनेचे त्रांगडं कसं सोडवलं जाणार हे पाहणे मनोरंजक ठरेल.

थ

## थाप : एक ठोकणे!

थापा मारण्याची कला खूपच थोड्या लोकांना अवगत असते. म्हणजे थापाडे असतात खूप पण पचतील अशा मारणारे नि थापांचे थरावर थर चढवून त्यांच्या थप्प्या रचणारे स्थूलमानाने थोडेच. इथे स्थूलमानाचा संबंध थेट हा थुलथुलीतपणाशी नाही. जातिवंत थापाबहादूर डफावर थाप पडावी तसे सुरू होतात नि न थकता थापांवर थापा मारीत जातात. थोबाडावर थोडाफारही फेरफार न करता थापा ठोकण्याची कला जमणारे हे नरबहादूर थापा. वैशिष्ट्य म्हणजे यांची जीभ थापा ठोकताना थोडीही थिजत नाही. हे थापा लोक थांबत नाहीत. ध्येयाकडे अथक वाटचाल करावी तसे कुठलाही थांबा न घेता थापांचा रतीब घालतात. यांची थोरवी अशी की यांची थापसृष्टी नि थापादृष्टीही प्रगत असते. इतकी की कोणास त्याचा थांग लागत नाही. मोराने थिरकावे तशी एकेक थाप यांच्या जिभेवर थुईथुई नर्तन करत असते. पक्ष्यांचा थवा उडावा तशा थापा आसमंतात उडत असतात. स्थलकाल वा स्थान काही असो, जातीचे थापाडे अचल व स्थिर राहतात. यांचा थापांचा कारखाना कधी थंड पडत नाही. यांच्या थापांचे थेंब इतस्ततः विखुरतात.

काही कारणाने थापांचा कारखाना थांबून थंडावला तर थकित थापांचा विचार करून हे थापसम्राट व्यथित होतात. या थापाबहादुरांकडे पाहून काही होतकरू उमेदवारी करू लागतात पण तरीही कित्येक थापाडे थापा ठोकण्याच्या कलेत थिटे पडतात. यांच्या जिभा मध्येच थिजतात, थोबाडावर थंडपणा न दिसता थोडाफार छद्मी भाव दिसू लागतो. यांची अवस्था बिकट होते.. कोणी पकडले की थोबाडीत मारल्यासारखी स्थिती होते. तरीही ह्यांच्या थापकलेत सुधारणा झाली नाही तर यांची छी थू होते. थेट स्वतःचे थडगे बांधण्याची पाळी यांच्यावर येते. पण हे जातिवंत थापाबहादुरांना थोपवण्यास पुरे पडत नाही. शेवटी थापा ठोकण्यातले थ्रिल यांना फुल्ल थ्रोटल थापा ठोकण्याकडे आकर्षित करत राहते .. न थांबता हे थापसम्राट आपल्या कलेस थोपटत थापटत पुढे नेत राहतात ..

द

## दीक्षित-दिवेकर!

तो दिनकर दीक्षित .. आणि ती दिव्या दिवेकर. देवाच्या घरी गाठी कशा बांधून दिल्या जातात पहा! दिन्याचा दादा दिगंबर, त्यांच्या दादरमधील दामोदर आणि सन्स या मिठाईच्या दुकानात कामाला असणारे दशरथ दिवेकर. दिवेकरांची कन्या दिव्या. दिवेकर म्हणजे दूध-दही खात्याचे प्रमुख. देशावरून येऊन द्वारपाल म्हणून नोकरीस लागलेले. पुढे दूध दह्याचे व्यवहार पाहू लागले. दोनतीन वर्षांतच दूध दही खात्याचे प्रमुख झालेले. दिवाणजींना हिशेब देऊ लागले. दिवाळीच्या दिवसांत दुकानात आलेली दिव्या दिगंबरच्या दृष्टीस पडली. पुढे दैवामध्ये लिहिल्याप्रमाणे नि देवदयेने दिनकर नि दिव्या या दोघांचे जुळले. देवाब्राह्मणाच्या साक्षीने दीक्षितांच्या घरी दिव्या आली.

त्याच दिवसांत मान्यवर दैनिकातील दैनंदिन चर्चेचा विषय होता दिवेकर आणि दीक्षित डाएट. दोन्ही बाजूचे आपापल्या दैनंदिन डाएटबद्दल दुराग्रही होते. एक बाजू दुसऱ्या बाजूस दूषणे देत होती. दुसरा काही विषयच नसल्यासारखा चर्चेचा दणादणाट सुरू होता. दीक्षित म्हणाले दूध वर्ज्य .. दिवेकरांकडे दही नको.. दूधच हवे.

दीक्षित म्हणतात, जेवण दीनवाणे .. शिक्षेसारखे हवे, तर दिवेकर म्हणतात, दिनभर जेवा पोट भरे! अशा वादे वादे जायते दीक्षित: वा दिवेकरा: चर्चेत दिव्या दिवेकरने दिनकर दीक्षितांकडे दरवाजावरचे माप ओलांडून प्रवेश केला. दीक्षित की दिवेकर? दिन्याच्या घरी ह्या प्रश्नावरून दीवार उभी राहण्याची शक्यता नव्हती. पण दिव्याने लग्नात घेतलेला उखाणा या संबधातला होता 'कुठे दूध कुठे दही सगळे अगदी सही.. दिनकरचे नाव घेते वाचत ही रेसिपींची वही'

दिगंबरदादानी जाहीर केले, "ना दीक्षित न दिवेकर .. दरवेळी या दीक्षित दिवेकरावरून दंगा होण्याचा दौर आलेला दिसत असला तरी देवाकडे दुवा मागूया.. असले वाद दूर ठेऊया.. दाल भात खाऊ.. देवदयेने दुधदुभते घरात भरपूर आहे.. दवापाण्याची कोणास जरूरी नाही .. तेव्हा दिवसमान कसेही असो.. दिवेकर की दीक्षित ही दुविधा इथे नाही. मस्त खा स्वथ रहा.. दुसरा कुठला कुणी कितीही दावा करो.."

दिगंबरच्या प्रतिपादनानंतर दीक्षित आणि दिवेकरांपुरता तरी हा दीक्षित-दिवेकर वाद दखल घेण्यापुरताही उरला नाही!

ध

## धुरंधर!

धारवाडच्या सौ.धरित्री धारपबाईंच्या जिभेची धार काही औरच होती. बाई खऱ्या धुळ्याच्या. लग्नानंतर धारवाडच्या धनंजय धारपांच्या घरी आल्या. त्यानंतर जिभेच्या धारेच्या जोरावर त्यांनी सारे घर धारेवर धरले.

'धनंजयरावांच्या 'धरपकडीत
धरले गेले कित्येक शूरवीर
धरित्रीची वाट पाहतो
धरवत नाही धीर'

या उखाण्याला उत्तर म्हणून लग्नाच्या धांदलीत त्यांनी पहिला उखाणा घेतला तो

'हृदयात धडधड पायात तोडा
वरातीसाठी धाकटा धडधाकट घोडा
वाड्यात वाडा धारवाडचा वाडा,
धरती म्हणे मला धनंजयरावां घरी धाडा'

आपल्या धारदार आवाजात असा उखाणा घेतला. लग्नानंतर स्वतःस हेमा नि धनंजयरावांना धर्मेंद्र समजण्या पर्यंत त्यांची धाव पोहोचली. ही धरित्री नाव धारण करणारी ड्रीमगर्ल पुढे ढीम्मगर्ल बनून असा धुमाकूळ घालेल अशा धोक्याचा विचार कोणी केला नसेल. धुमाकूळ कसला धुमश्चक्रीच.

लग्नाची धामधूम संपली. धरित्रीबाईंच्या स्वभावाचे धरण जणू फुटले. धनंजयरावांची अजूनही धुंदी उतरली नव्हती. धनंजय-रावांच्या सालस स्वभावाला धक्का देत नि कोणालाही धूप न घालता धरित्रीबाईंनी आपले धूमशान सुरू केले. धनंजयरावांना हा पहिला धक्का बसला. धनंजयरावांच्या धकाधकीच्या आयुष्यातील हालाला धरित्रीबाईंच्या धारदार जिभेने धरबंद उरला नाही. बोलण्याचे निमित्त करून धरित्रीबाई अगदी दे माय धरणी ठाय करत सगळी जुनी धुणी धुवायला लागल्या. कोणाच्या डोळ्यांत धूळफेक करत, नि कोणताही धागा कोठेही जुळवत आपल्या मुखरूपी धनुष्यातून वाग्बाण सोडू लागल्या की अगदी धुमश्चक्री सुरू झाली अशी कोणाचीही धारणा होई.

धनंजयराव काही बोलले की धूर्तपणे धाय मोकलून रडत. पुढे अर्थातच धूर्त धरित्रीबाईंनी सर्वांची अशी धारणा करून दिली की त्यांच्यापासून दूर राहण्याचीच धोरणाचीच कास सर्वांना धरावी लागली. धनंजयरावांचा धीर खचू लागला. कुठे आशेची धुगधुगी दिसेना. धसमुसळेपणा करून नि धाकदपटशाने धरित्रीला धाकात ठेवणे त्यांच्या स्वभावात नव्हतेच.

-पण दैवाने साथ दिली..

या धबडग्यात नि धकाधकीत तरूण वयातच धनंजयरावांच्या कानाने दगा दिला. कोणाला त्यांच्या तरूणवयातच आलेल्या बहिरेपणाचा धक्का बसला असेल पण धनंजयरावांचे धापा टाकणारे आयुष्य आता धडधड धावू लागले.

कानात मशीन आले, हवे तेव्हा ते सुरू बंद करून हवे तेव्हा ऐकता न ऐकता धरित्रीच्या डोळ्यात धूळ फेकण्याची सोय झाली. एक धोका टळला. धरित्रीबाईंच्या साप सोडून भुई धोपटावी तशा बोलण्याचा धैर्याने सामना करता येऊ लागला. इतका की, धरित्रीबाईंची ख्याती ठाऊक असलेले धारवाडचे धुरीण धनंजयरावांना धुरंधर धैर्यधर म्हणू लागले!

न

## नाटक झाले.. जन्माचे

नयनतारा ननावरेंचा नवरा, निर्मलकुमार तसा निर्मळ मनाचा. नित्य नेमाने तो नाटकाची तिकिटे काढे, नयनताराला नाटकाची हौस भारी म्हणून. नाही म्हणायला आठवड्यात एक हा नियमच जणू. नोव्हेंबर महिन्यात दिवाळीत तर नरकचतुर्दशीपासून रोज एक नाटक असा नेम त्यांचा. निर्मलकुमारला आवड नसली तरी नयनतारा बरोबर इच्छा नसतानाही नोकरी सांभाळून नाटकाला जावेच लागे. नको म्हणायची प्राज्ञा नव्हती म्हणाना. नाटकाच्या आभासी दुनियेत नयनतारा रममाण होई, नाटकाच्या नादात दिवस कसा निघून जाई हे तिला जाणवत नसे. नाटकाचे वेड वाढले नि नयनताराला ही नवीन दुनियाच आवडू लागली. नुसत्या खऱ्या दुनियेत नाविन्य नाही, नित्य नवे विषय नाहीत नि तशी गंमतही नाही ..

"निर्मल, असे नाटकासारखे नको का जीवन?"

नयनतारा निर्मलकुमारला विचारे.

"नाटकातील नट नट्या खऱ्या नाहीत नयन.. जाणूनबुजून न खरे - ती नखऱ्याची दुनिया.."

नयनतारास तात्पुरते पटत असे, पण परिणाम जास्त काळ टिकत नसे. नजरेसमोर नाटकाचा पडदा वर

जाई, नांदी सुरू व्हावी, नाटक घडू लागावे.. नाटकातील पात्रे एका नादाने नादावून व्यक्तीरेखा साकार करू लागत.. हे नाट्य त्यांना नेत्रदीपक वाटे.

नयनताराच्या नेत्रांना हे नेत्रसुख निरंतर हवे हवेसे वाटे. नयनताराचे हे नाट्यवेड नाही म्हणायला फार नाही तर नऊ वर्ष टिकले. नव्याचे नऊ दिवस म्हणून निर्मलकुमारने नवीन लग्न झाल्यावर नाटकाची तिकिटे काय आणली, पुढे नाटक झाले जन्माचे म्हणायची नौबत आली. निर्मलकुमारने निर्मळमनाने नयनताराला न नाकारता आधी नैसर्गिकरित्या ती बरी होण्याची वाट पाहिली.. त्याने न जमल्याने एका नवीन मानसोचार तज्ञाची मदत घेतली आणि

नऊ वर्षांनी नयनताराच्या मनातल्या नाटकाचा नाट्यमय नायनाट झाला, नाटक झाले जन्माचे म्हणण्यापासून नयनतारा नि निर्मलकुमार बचावले.

प

## पुनरूक्ती

परत परत पुनरूक्ती म्हणजे आधीच पिवळ्या असणाऱ्या पीतांबराला पिवळा पीतांबर म्हणणे. पुनरूक्ती म्हणजे एकच अक्षर, शब्द वा वाक्याची पुनरावृत्ती. पुनः पुनः तेच. पण हे प्रथम दर्शनी पटणार नाही. पुनः पुनः फिरवून खुंटी बळकट करावी लागते. नाहीतर ती निखळून पडण्याची शक्यता असते. पहा पटते की नाही ते.

पुनरूक्तीचे प्रयोग प्राण्यांच्या मेंदूवर करण्यात आले. प्राथमिक प्रयोगात पाहण्यात आले की पुनरूक्तीमुळे प्राणी शिकत गेले. एखादी गोष्ट पचनी पडण्यासाठी पुनरूक्ती, एकाच गोष्टीचा पुनरूच्चार यांच्या परिणामी पुढील प्रशिक्षण होत असावे. पुन्हा पुन्हा पाहिल्या-ऐकल्याने मेंदूतील पेशींत खुंटी परत परत फिट्ट बसत असावी. या पुनरूक्तीचे परिमाण काय असावे? आपापल्या परीने नि परिस्थितीनुरूप याचा परिणाम साध्य करण्याचा प्रयत्न प्रत्येक प्रशिक्षकाने प्रामाणिकपणे करावयास पाहिजे. त्यासाठी पहिल्यांदा पुनरूक्तीचे महत्त्व पटले पाहिजे. परंतु एक आक्षेप असा की पुनरूक्तीने प्रशिक्षित पोपट ही पोपटपंची करतो तसे प्रशिक्षण नसावे. पुनरूक्तीने फक्त पाठांतर

होते. पटण्यासारखे आहे हे. पण या आक्षेपावर साक्षेपी पद्धतीने पाहिल्यास पुनरूक्तीसोबत अन्य प्रशिक्षणही प्राधान्याने व्हावयास पाहिजे. पाठांतराचेही काही महत्त्व आहेच.

पुस्तकी ज्ञान पुरेसे नाहीच तरीही पुस्तकास पर्याय ही नाही. तेव्हा पुनरूक्ती, पाठांतर, पाठ्यपुस्तकांचे वाचन हे प्रशिक्षणाचे प्राथमिक प्रकार म्हणावयास हरकत नसावी.

हा मुद्दा परत परत आता सांगावा का? नकोच. नाहीतर पुनरूक्तीचा आक्षेप या परिच्छेदावरच घेतला जाईल!

प्र

## प्रकाश प्रेरणा

'प्रकाश प्रेरणा प्राथमिक प्रशाले'च्या प्रशस्त प्रांगणात प्रभाच्या प्रथम दर्शनातच प्रमोदची प्रतिक्रिया प्रथम तुज पाहता अशी झाली होती. प्रभा प्राथमिक शाळेत प्रशिक्षक नि प्रमोद प्रमोशन होऊन प्रशालेत आलेला. प्राथमिक शिक्षण हा पाया म्हणून प्रकाश प्रेरणा प्राथमिक प्रशालेचा नव्याने प्रारंभ झालेला. प्रात:कालीन प्रार्थनेसाठी प्रांगणात मुले जमत. प्रणाम नि प्रार्थनेनंतर प्रभाचा शारिरीक प्रशिक्षणाचा तास असे. प्रमोदचा प्रशालेतील प्रथम दिवस. प्रमोद प्रवेशद्वारातून प्रवेश करता झाला नि प्रभातीच्या प्रहरी प्रभाच्या प्राकृतिक सौंदर्याच्या प्रथम दर्शनाने प्रभावित झाला. प्रकाश प्रेरणा प्रशालेत नव्याने प्रवेश करताना आपल्या प्राक्तनात अशी प्रभा असेल तर.. या विचारानेच तो प्रफुल्लित झाला.

प्रभा नि प्रमोद यांच्या प्रेम प्रकरणाचे प्रथम प्रकरण तरी लिहिले जाईल का? प्रभा प्रमोदच्या प्रेमाला प्रतिसाद देईल का? प्रमोदचा प्रभाव प्रभावर पडेल का? अप्रतिष्ठित प्रवर्गातील प्रमोद गप्रेस प्रतिष्ठित समाजातील प्रभा प्रभुणेची प्राप्ती होऊ शकेल? प्रमोद नि प्रभा प्रियकर नि प्रेयसी होतील का? प्रमोद आपल्या प्रीतीचा प्रस्ताव प्रभासमोर दुपारच्या प्रहरी तळपत्या

प्रभाकराच्या साक्षीने प्रस्तुत करेल नि त्याचवेळी प्रभंजनाचा प्रहार होईल? समाजातील उतरंडीत प्रमोदच्या प्रमादाकडे दुर्लक्ष करून त्याला प्रतिष्ठा मिळेल का? प्रभा-प्रमोदच्या प्रेमाला किती प्रतिरोध होईल? प्रभा नि प्रमोदच्या प्रेमप्रकरणाचा प्रवास कोणत्या प्रकारे पार पडेल? या प्रेमावर समाजात काय प्रतिक्रिया प्रकटतील? प्रतिष्ठित समाज प्रागतिक विचार करेल का? या प्रकारची प्रत्येक प्रेमकथा अशा प्रश्नांच्या उत्तरातूनच प्रकटते का?

या सर्व प्रकट-अप्रकट प्रश्न-प्रतिप्रश्नांची उकल करण्याचा एक प्रामाणिक प्रभावी आणि प्रसन्न प्रयत्न.. 'प्रकाश प्रेरणा..' आपल्या प्रिय 'प्रभात' चॅनेलवर.. प्रसिद्ध लेखक प्रभाकर प्रेमदास यांनी आपल्या प्रथितयश लेखणीतून प्रसवलेली ..

लवकरच येत आहे.. 'प्रकाश प्रेरणा..'

प्रथम प्रकरण.. या प्रतिपदेपासून ..

फ

## फकिरा

तंबाखूची फकी मारत फकिरा उठतो. तसे फकिराला व्यसन कसले नाही, फक्त फुकटात मिळाली तरच तो तंबाखूची फकी मारणार. आणि असे फुकटफाकट देणार कोण? पण फकिराला त्याची फिकीर नाही. त्याला तशी कसली फारशी तलफ येते असेही नाही. फणसाच्या झाडाभोवती बांधलेल्या पारावर फकिरा दिवसभर फेऱ्या मारत फिरतो. तिकडे कोणी फरशी बसवलेली तिच्यावर फतकल मारून कधी बसतो. डोक्याचा फेटा उशाला घेऊन फटाफट झोप काढून घेतो. फारशी तोशिस पडणार नाही इतपत फुटकळ काम करतो, फावल्या वेळेत. चणे फुटाणे खाऊन राहतो. जास्त पैशाची हाव नाही की फायदा कशात मिळेल त्याचा फारसा विचार नाही. फुकटात काही मिळेल ते फायद्याचे. त्यासाठी फटाफट काही करावे असे नाही. फळाची अपेक्षा न करणे हा उपदेश आचरणात आणणारा फकिरा एकमेव फकिर नसलेला बेफिकिर माणूस असावा. तो कधी फळे विके तर कधी फुलं. कधी कंगवा फणी विकत फेरीवाल्याचे कामही केलेले, कधी फटाके विकले. पण फारसे मानवले नाही म्हणून फार न ताणता काम सोडून दिलेले. कुणी फटफटीवर फुकटात फिरवून

आणले तर फर्लांग दोन फर्लांग दूर फिरणे होई नाहीतर त्या फणसाच्या झाडाभोवती फेऱ्या मारणे याहून दुसरे काही नाही. फकिराबद्दल सांगतात .. फाल्गुनी नावाच्या एका फटाकडीने त्याला दिलेल्या फटक्यानंतर तो असा फाटका इसम झालेला. तिचा फोटो फकिराकडे अजूनही आहे. लांब फ्राॅकमधील ती फाकडू मुलगी.. पण फकिराला आपल्या फुसक्या प्रेमकहाणीचे फुगे फुगवत राहणे आवडत नाही. त्या गोष्टीवर फुली मारून फकिरा आता असा एखाद्या फकिरासारखा विरक्त झाला म्हणतात. फाल्गुनीबरोबरची विफल प्रेमकहाणी मनात तळहातावरल्या फोडासारखी जपत फकिरा जगतोय.. कोणाला कितीही फालतू वाटो त्याचे आयुष्य याची फिकिर न करता..

ब

## बब्बन

बेकार बसून राहणे बबनला आवडत नाही. अर्थात बबनच्या बाई त्याला तशा बसू देत नाही.

"बबन्या, बाईंचे ऐकणार ना तू बेटा?"

बाई म्हणत नि बबन बळेबळे डोके हलवे. बाकी काही नाही तरी बाईंना बरे वाटावे म्हणून बबन काही न बोलता कामाला लागे. बबन बुरकुलेबाईंचा कोणी नव्हता. बेघर बबन बाईंना रस्त्यावर सापडलेला. बाईंनी घरी आणून आपल्या बारक्या बाळासारखा वाढवलेला. बबन तसा बिनडोक म्हणावा तसा, मेंदू बेतासबात असलेला. मेंदूची बहुधा वाढच खुंटलेली, पण बाई त्याला बारीकसारीक कामातून बरेच काही शिकवत. बिनाकामाचे बसून न राहणे हे त्यातील एक. बबनच्या बारक्या मेंदूत बऱ्याच गोष्टी बाईंनी शिकवून कोंबलेल्या. बबनही बाईंना बरे वाटावे म्हणून त्या बऱ्यापैकी शिकलेला. बाईंना बोट दाखवायला जागा मिळू नये म्हणून काळजी घेणारा. बबनच्या छोट्याशा आयुष्यात बुरकुले बाई सोडल्यास बाकी कोणी नव्हतेच. बाईंना तरी बबनशिवाय कोण होते?

अशा बुरकुले बाईंच्या घरात तो बुटका इसम शिरला. लांब बाह्यांचा बुशशर्ट आणि लुंगीत. नाव

बरकतअली. बबन त्याचा बच्चा आहे सांगणारा. वर्षभर बरकतअली होता कुठे? बबन नव्हे तर बब्बनशेर नाव म्हणे बच्च्याचं. उरूसात बच्चा हरवला. आपल्या बगलबच्च्यांसह बरकतअली बाईंच्या त्या बैठ्या घरात शिरला नि बाजूला बघ्यांची बरीच गर्दी जमा झाली. बबन बाईंचा कोणी नव्हताच.. पण तो बरकतचाच बच्चा हे कसे सांगावे .. तेही इतने बरसों के बाद? बरकतला विचारले तर तो त्याचे बेडकासारखे बटबटतीत डोळे अजून बडे करत बडबडू लागला.. "बाई, बोरगावच्या बहादूरबाबाच्या जत्रेत बोट सुटलं.. आता बाजूच्यांनी पाहिलं. हाच बब्बनशेर.." मग बबनकडे वळून म्हणाला, "आजा मेरे बच्चे .. मेरे बब्बन शेर."

बाईंना आपल्या बहात्तरव्या वर्षी अशी काही बाब उद्भवेल असे वाटले नव्हते. तरीही बाईंनी साधकबाधक विचार केला. बाई आज आहेत तर उद्या नाहीत .. बळजबरीने बबनला ठेऊन घ्यावे तर बाईंच्या मागे या मंद बुद्धीच्या बबनचे काय? बरकत अली म्हणतोय तर बबन असेल ही त्याचा बच्चा.

"हा बच्चा आमची बकरी पाळायचा.. बैतुल याद है तुझे बब्बनशेर?"

बबन आधीच मुका.. त्यात बालबुध्दीने काय बोलणार? बाई त्याच्या बोलक्या चेहऱ्याकडे बघत होत्या.. बैतुलचे नाव घेताच बबनचे ते बोलके डोळे चमकले. बहुधा ती बैतुलच त्याचा एकुलता एक आधार असावी .. बाईंची खात्री पटली. बारा महिन्यांत बबन

आपल्या बोलणाऱ्या बापाची ओळख विसरला असेलही .. पण मुका बब्बन मुक्या बैतुलची.. बकरीची ओळख विसरला नसावा..

बाईंनी त्याची बॅग भरली. बरकत अलीचे बोट धरून बबन बब्बनशेर बनून रवाना झाला.. "बाई, एकुलता बच्चा. हरवला नि याची अम्मी चल बसी. नशिबाला बोल लावले सगळ्यांनी. बहुत शुक्रिया.. बच्च्याला सांभाळून घेतले. आता बोट धरून बरोबर घेऊन जातो.." बुशशर्टाच्या बाहीला डोळे पुसत बब्बनचा बाप बोलला.

जाता जाता मागे वळून बबन बाईंकडे बघत होता. आणि बाई तो दिसेनासा होईतो बघत काही न बोलता आपल्या डोळ्यांतले पाणी पुसत होत्या.

भ

## भरती

वांग्याचं भरीत डब्यात भरून ठेवताना भडभडेंना भरून आले. भारतीला भरपूर आवडणारा पदार्थ तो. एरवी मोजूनमापून खाणारी ती भरीत मात्र भरपेट खायची. श्री.भरत भडभड्यांची भार्या भारती भडभडे भरधाव गाडीखाली आली. भारतीला जाऊन आज भरपूर वर्षे झाली. पण तिच्या आठवणीत भडभडे वर्षात एकदा तरी भरीत करतातच नि तिच्या आठवणींचा भरगच्च समारंभ भर दुपारी करतात. त्यात त्यांचा भर तिला आवडणारे पदार्थ करण्यावर असतो. भरलेली घरे सोडून त्यांची मुलगी आणि भारताबाहेरचा मुलगा येतात. एक दिवसासाठी भडभडेंचे घर भरते. भार्येच्या आठवणींना भरते येते, भडभडेंना भरून येते. संध्याकाळी भरतीच्या वेळी सगळे समुद्रावर जातात. भारतीचे आवडते ठिकाण म्हणून भर समुद्रातील भरतीच्या लाटा पाहात उभे राहतात. भडभडेंना भरभक्कम आधारासारखे असणारे भाऊबहीण निघून जातात. मग भडभडे भारतीच्या आठवणींसोबत भुतासारखे एकटेच राहतात ..

म

## मनोजची मंदाकिनी!

मकरंद : मन्या.. कोण ती ध्यानी मनी जिची तुजवरी पडली मोहिनी?

मनोज : ती.. ती माझ्या मनची इच्छा.. मक्या.. ती माझी मनी.. मनीषा.. मडकईकरांची मंदाकिनी ..

मकरंद : मूर्ख नव्हे .. महामूर्ख .. मख्ख .. मंद .. मतिमंद .. मन्या तुला भेटल का ती मंदाकिनी.. मंदाकिनीची मनीषा बाळगणाऱ्या मनुजा मनोज.. जा.. पण मन्या तुझ्या मनोवृत्तीची मज मजा वाटते..

मनोज : मजा? माझ्या मज्जातंतूंची कसम.. या हृदय मंदिरात एकच मूर्ती .. या मनिचे एकच मनोरथ.. ती मनोरम मनोहर मनकर्णिका मत्सखी मंदाकिनी ..

मकरंद : सखी? मग मी बापडा माझ्या या मुखातून काय वदणार? माझे मत म्हणजे, मोहक मोगऱ्यासारख्या त्या मंदाकिनीस बटमोगऱ्यासारख्या मुलाचा मोह होईल? अन झालाच तर तिच्या मागास घरात मोडता घातला जाणार नाही? मला मनोमन वाटते म्हणून म्हणणे ऐक माझे.. मर्यादा ओळख.. मती भ्रष्ट होऊ देऊ नकोस.. दुरून मनोहारी ती मदनाची मंजिरी. असेल साजरी .. आपल्या मेंदूवर मेदाचे थर जमू देऊ नकोस. हा इश्काचा मुंगळा डसला की मुक्तता नाही..

मनोज : इश्काचा मुंगळा? तुझी मराठी मोकाट सुटलीय मक्या..

मकरंद : अर्थात. मुकाट ऐक. हा सर्वात्मक्या मोघम बोलत नाही. मित्रास मनापासून मदत करणे हे मक्याचे मुख्य कर्तव्य आणि मक्याचा हा मूलभूत गुणधर्म आहे.

उगाच मंदाकिनी मंद पावलांनी मनोजच्या मनमंदिरात येऊन स्थानापन्न होईल अशा मनोरथांचे मनोरे रचू नकोस. मुखावर आपटलास की मुखभंग होऊन मूग गिळून बसावे लागेल. या मित्राच्या म्हणण्याचे मोल ओळखशील तर मनोमन माझे आभार मानशील..

मनोज : मंदा. मंदाकिनी. माझ्या मनमस्तिष्कात मुक्त संचार करणारी ती. मी मूकपणे तिला पाहतो. मक्या, तू कितीही मल्लीनाथी केलीस तरी माझ्या मनातील ती.. मोत्यासारखे दात.. तिच्या मनमोहक हास्यातील मिठास.. आपले मृदुल कर मुखकमलावर झेपावणाऱ्या मुलायम केसांत फिरवते ना तेव्हा ती मोहक अशी दिसते जणू गुलमोहरास मोहर आला असावा ..

मकरंद : गुलमोहर? मन्या, मोहराचे नाही माहिती .. तू गुल होशील. फोडणीतल्या मोहरीसारखा तडतडशील. मिस्टेक त्या मुंगळ्याची आहे. एकदा डसला की मग त्याची नांगी तुटो की पारंबी.. मार्ग मोकळा सोडायचा नाही.. मतितार्थ हा.. एक मनोज नामक मनुज कामातून गेला..

मनोज : मासा पाण्यातून बाहेर यावा असा मी.. मुंगळा म्हण की मुंगी चावली म्हण. मंदाकिनीच माझी मल्लिका.. माझ्या मनमंदिरात मनमुराद विहार करणारी मनमोहक मंदाकिनी. मी येतोय .. मंदाकिनी .. माझी मनकर्णिका.. साऱ्या मेखलांचे बंधन मोडून हा मनोज येतोय. मौका पाहून समोर येतोच.. मंदी तू मनाने माझ्याबरोबरच आहेस..

## यशवंताच्या पाठीमागे ..

यरकुंडवार : यशवंत यंदा कदाचित नाहीं येणार ..

यदुनाथ : योगी यशवंत? पण यंदा यदाकदाचित आलाच तर?

यरकुंडवार: असं म्हणता यदुनाथराव? पण योगायोगाने आला तरच येईल.

यदुनाथ: कोण? योगी? तसा अयोग्य शब्द आहें. योगाभ्यास रोज करतो तों..

यरकुंडवार : म्हणून योगी? यथाशक्ती नि यथामती योगासनं मी पण करतो. यावरून मला नाहीं योगी म्हणत तों कोणी?

यदुनाथ: यरकुंडवार तुमचे खरेय. पण त्याचें यच्चयावत सारे यारदोस्त येडचाप. योगीपणाशी यत्किंचितही संबंध नसतानां त्या यशवंत येडेकराला योगी म्हणणें .. योगी बनणें म्हणजे येरागबाळ्याचे काम नोहें.

यरकुंडवार : सारेच यथातथा आणि काय? येणकेण प्रकारेण.. युवराजास योगी बनवण्याचा यत्न करणें. यात हे लोक यशस्वी झालें पण यासाठी यासारखा अट्टाहास योग्य दिसतो कां?

यदुनाथ : योग्य? योग्यायोग्यतेबद्दल विचार कोण येऊ देईल मनात? एकदा योगी म्हटला की यथाशक्ती नि यथायुक्ती योजना आखून यजमानांबरोबर यथास्थित मिरवितां येतें. यासाठी सारी यातायात. योगी यशवंत येसाजी येडेकर..

यरकुंडवार : नाही.. नाही.. योगी युवराज नव्हे! युवराज? नुसताच युवा आहे तो. युवराज नव्हे! योगी युवराज यशवंत येसाजी येडेकर नाहीच नाहीं!

यदुनाथ : हुं.. युवा? अजून यौवनात मी म्हणे. युक्ती करून यौवन दाखवता येतें. नाही, ते लाख युक्तीवाद करतील.. पण याचे वय लपतें कां? शोध नाहीतर म्हणावें.. कुणी युवराज्ञी..

यरकुंडवार : हुं.. कोणी याला यमी मिळते का याचा शोध घेईल तेव्हा याच्या ध्यानात येईल.. युवराज म्हणे! युगानुयुगे वाट पाहिल तरी कुणी युवती या युवा युवराजाला भीक घालणांर नाही ..

यदुनाथ : जाऊ देत यरकुंडवार .. नाही तर येऊ देत. याच्याशी आपल्याला काय करायचेय?

तो असेल सकल गुण युक्त.. आपल्याला अशा योजनाबद्ध युक्त्या जमल्या असत्या तर आपणही नसतों.. योगी युवराज?

यरकुंडवार : खरंय. येणकेण प्रकारेण करायचे म्हटलें की यथाक्रम सारे यायला लागतें डोक्यात .. मग योग्यता असो की नसो.. योगायोगाने योगी बनतो यावर आपण काय बोलणार?

यदुनाथ : हुं.. यथार्थ अगदी! आपण बरें नि आपले यमनियमानुसार काम बरें! कसें?

यरकुंडवार : योग्य! यदुनाथराव योग्यवेळी योग्य बोलतात!

र

## एक रिपोर्ट

आज रविवार दि.अठरा फेब्रुवारी रोजी रहिमतपुर येथील रंगभवन नाट्यमंदिरात सुप्रसिद्ध पार्श्वगायिका श्रीमती रसिका रसाळ यांच्या सुरील्या आवाजात रंगभूमीवरील रसील्या गीतांचा रंगारंग कार्यक्रम रसिकांच्या अलोट गर्दीत पार पडला. रंगभवन सभागृह तुडुंब भरल्याने झुंबड उडाली, रस्त्यावरील गर्दीचा रागरंग पाहून पोलिसांना पाचारण करावे लागेल की काय अशी परिस्थिती उद्भवली. या रेखीव कार्यक्रमाची रंगीत तालीम एक आठवडाभर रात्रंदिवस सुरु होती. रंगभूमीवरील गीतांनी घडवलेल्या इतिहासाचे रंगमंचावरच पुनरूज्जीवन करण्याचा हा प्रयत्न असल्याचे निर्माते रंगराव रावराणे यांनी दैनिक रामरहिम चौफेरशी बोलताना सांगितले. गायिका रसिका रसाळ यांच्या आवाजाची जादू रसिकांनी अनुभवली, रामलीलेनंतर रहिमतपुरातील हा प्रथमच रेका◌ॅर्ड ब्रेक करणारा कार्यक्रम असून आम्ही अजूनही काही रंगभूमीवरील रत्ने सादर करू असेही श्री.रावराणे म्हणाले. त्यांची रूपरेषा बनवणे सुरू आहे. रसिकांच्या आश्रयावर सारे काही अवलंबून आहे. रतलाम तालुक्यातील रहिमतपुर या रचनात्मक कार्यक्रमांमुळे लवकरच तालुक्याची सांस्कृतिक राजधानी बनेल असेही श्री.रावराणे म्हणाले

# ल

## लाल लटिके..

लटिके बोलून लटकावे? आम्ही म्हणतो लटिके बोलून लटकणारे.. लानत है तुमपर. सफेद झूठ असते तसे लाल लटिके असते का? कृष्णवर्णीय लटिक्या झूठला रंगसफेदी भाषेच्या माध्यमातून का केली जात असावी? लटिके बोलण्याची लालिमा का पसरू नये? म्हणजे लाल लटके म्हणावे? कदाचित पुढेमागे लोक तसे म्हणतीलही. लांबवरचा रस्ता आहे तसा.. पण लाल लटिके या शब्दाचे श्रेय आम्ही लाटणार किंवा लुटणार हे खरे. म्हणजे लेखणीचे लफ्फेदार फटकारे मारत लेखन करणारे आम्ही पत्रकार नाही, ना ही शैलीदार लेखक. लेखन प्रांतात लुडबूड करण्याची आमची लालसा नाही. म्हणजे लाख तशी आमची लालसा असली तरी आम्ही लटिकेच असे सांगतो आहोत. कारण आम्हाला लोक कच्चा लिंबूच समजणार. आम्ही लक्ष ठेऊन असतो, पण लोकांचे बोलणे मनाला लावून घेत नाही हा भाग अलाहिदा. आमचे लक्ष्य एकच.. लिंग्विस्टिक रिफा◌ॅर्म्स! मराठी भाषेला परदेशी लँग्वेजची लत न लागता नि त्या लँग्वेजेसपुढे लोटांगण न घालता ती अॅट लिस्ट काही अंशी, लेटेस्ट शब्दांना लोंबकळत का होईना, पुढे जावी हे

लक्ष्य आमचे. आमची लोकल लँग्वेज मागे पडते याची लक्षणे आमच्या लक्षात आली नि लगेच आम्ही त्यासाठी खटपटी अन लटपटी करू लागलो. लाँग वे आहे पण त्यासाठी मेहनत करावी लागली तरी आम्ही लागलीच रेडी झालो. मग कुणी आम्हाला भलेही लिंग्विस्टिक लोफरचे लेबल लावो! काही होवो हे लिंग्विस्टिक लॉक उघडून लिंपिंग मराठी भाषा शुड स्टार्ट लिपिंग अहेड. आमची ही भाषा लालसा जेन्युईन आहे.. कुणी कितीही त्याबद्दल लाल लटिके बोलतो आम्ही असे काही लागट लिहो!

व

## वडवट्टीवार

'आम्हाला वगळा, मग आम्हाला वेगळा विचार करावा लागेल', विदर्भातील मान्यवर व्यक्तिमत्व असलेले वेंकटेश वडवट्टीवार आपल्या वरिष्ठांना इशारा देत आपला इरादा व्यवस्थित स्पष्ट करत होते. वरिष्ठांचा विचार वेगळाच असावा. गेल्या वीस वर्षांत वेंकटेश वडवट्टीवारांना विचारल्या वाचून पक्षाचे पान हलत नसे. विमानासारखा पक्ष वरवर जाण्यात वडवट्टीवारांचा हात होता. एखाद्या वंगणासारखे वडवट्टीवारांनी काम केले नि कुशल व्यवस्थापन, व्यक्तिगत लक्ष नि व्यवहारीपणातून वेगवेगळ्या लोकांना घेऊन पक्षाची व्यवस्था उभारली. व्यक्ती म्हणून वडवट्टीवार महत्त्वाचे खरे, पण पक्षाची गरज सरली की वडवट्टीवार वैद्य आता गेले तरी चालतील.. त्यांना वापरून झाले.. पक्षाच्या विचारसरणीबद्दल वडवट्टीवार वरवरचा विचार न करता उगाच विचित्रपणा करत विशेष खोलात विचार करतात, पक्षाची विचारसरणी म्हणजे, विचार पक्षासाठी आहे, पक्ष विचारासाठी नाही, असे वरिष्ठांना वाटे. विचारसरणी ही आपल्या वाट्याला येणारा सत्तेचा लोण्याचा गोळा पकडण्यासाठी वापरायची एक वाटी किंवा वाडगे आहे ..

वरिष्ठांचा हा विचार पक्का होता. त्यात विचारांचा वाटेल तसा बागुलबुवा उभा करून वडवट्टीवार विशेषतः विदर्भात विचित्र समस्या निर्माण करत आहेत असे वरिष्ठांना वाटे. वरकरणी वडवट्टीवारांना त्यांच्या वर्तणुकीचा जाब न विचारता त्यांना डावलणे हा वरिष्ठांनी एकूणच विचारांती घेतलेला निर्णय होता. जागा वाटपाच्या वेळी वडवट्टीवारांना वरवर विचारल्यासारखे दाखवून त्यांच्या वाटचे उमेदवार डावलणे, वरिष्ठांनी ठरवून केलेली ही वाटमारीसारखी खेळी वडवट्टीवारांच्या ध्यानी वेळीच येती तर ही विचित्र अवस्था झाली नसती. राजकारणात वेळ साधणे महत्त्वाचे, तेव्हा वेळ न दवडता वडवट्टीवारांनी वरिष्ठांना आपला राजीनामा पाठवून दिला. विविध पक्षांच्या वचळणीखाली जाणारे ते नव्हतेच. त्याच दिवशी संध्याकाळी वरिष्ठांच्या नाकावर टिच्चून कोणत्याही विशिष्ट शिष्ट वर्गाचे प्रतिनिधित्व न करणाऱ्या विदर्भ व वंचित समाज विकास विचार पक्षाची घोषणा वेंकटेश वडवट्टीवारांनी केली. वरवर ही घटना विचित्र वाटेल, पण विशेषतः राजकारणाच्या अभ्यासकांना हा विषय विशेष विचारात पाडेल. वापर करा आणि फेकून द्या.. हा विचक्षण व्यापारी विचार म्हणजेच विलक्षण व्यवहारी चाणक्य विचार म्हणावा का? की विसविशीत वैचारिक राजकीय विचारसरणीचा परिपाक?

## व्य

### व्याकरण

व्यारा गावातील व्यापारी व्यंकटेश वांगीकर यांचा कामाचा व्याप तसा मोठा होता. व्यंकटेश वांगीकर म्हणजे व्यापारी वृत्तीचे. व्यय आणि नफा यांचे व्यस्त प्रमाण समजून व्यय कमी करणे या व्यतिरिक्त दुसरा विचार नाही. व्यवसाय नि व्यापाराची व्याप्ती अधिकाधिक व्यापक करण्यात ते नेहमी व्यग्र असायचे आणि व्यवसायचेच विचार त्यांच्या मनास व्यापून असायचे. व्यवसाय म्हणजे नफा एवढीच त्यांची व्यावहारिक व्याख्या होती. त्यामुळे व्यावहारिक राहून सारे व्यवस्थापन सर्व व्यवधाने सांभाळत तेच पाहात. नफा हेच व्यसन असे घडू लागलेले काही. त्यामुळे व्यक्तिगत आयुष्य असे कमी उरलेले. घरच्यांची ही व्यथा होती तर नफा मिळवणे फक्त व्यवहार्य हा त्यांचा व्यापारी विचार होता. त्यात कोणी व्यत्यय आणलेला त्यांना पटत नसे, कोणीही कितीही व्याकूळतेने सांगितले तरीही.

अशात एक दिवस व्यारामध्ये श्री.व्योमकेश व्यंकटेश्वर भेटीस आले, व्यंकटेश यांचे जुने मित्र नि आता व्याहीही. व्योमकेशने व्यंकटेशची अष्टप्रहर व्यापून ही न संपणारी अस्ताव्यस्त जीवनशैली पाहिली.

"इतका व्यग्र तर देशाचा प्रधानमंत्री ही नसेल व्यंकटेश .." व्योमकेशने सांगितले

"तूच सांग.. व्यापार हा पूर्ण वेळ व्यवसाय आहे की नाही?"

"अर्थात. पण व्याकरण महत्त्वाचेच .."

"व्याकरण?"

"यस, जीवनाच्या भाषेचे व्याकरण! येथे काही व्याकरणाचे नियम आपणच आखून घ्यावेत, अशी व्यग्रता नि जीवनातला आनंद यांचे प्रमाण व्यस्त असते हे समजून."

"तुझे मत तू व्यक्त करतोयस.."

"हे बघ व्यंकटेश, व्याकरण म्हणजे भाषेची शिस्त. तसेच हे. येथे व्यवस्थापन महत्त्वाचे. वेळेचे व्यवस्थापन व्यवस्थित करून व्यवसायाची व्यवस्थित व्यवस्था लावशील तरच तुझी व्यग्रता कमी होईल."

"व्योमकेश, तू सुद्धा असे म्हणावेस?"

"अर्थात व्यंकटेश, व्यक्तीच्या आयुष्यात कामा व्यतिरिक्त इतरही बाबी असतात, इतरही व्यक्तींना तुझी गरज असते. कामाचे व्यसन हे इतर व्यसनांसारखे .. व्याधीसारखे. व्यसनाधीन व्यक्तीला त्याचे व्यवधान राहात नाही. कामाचा व्याप पुरे व्योम व्यापून राहतो. खरेतर असे भान न राहणे ही या व्यसनाची व्यवच्छेदक व्याख्या म्हणता येईल."

"म्हणजे?"

"म्हणजे व्यवस्थापन.. व्यवस्थापकांची नेमणूक करून कामाचे वितरण केलेस तरच ही व्यवस्था तुला लावून देता येईल. व्यय थोडा वाढेल. पण व्यग्रता कमी

होईल. बघ, मी माझे मत व्यक्त केले.. तुला एखाद्या व्याख्यानासारखे नाहीतर प्रवचनासारखे वाटत असेल तर.."

"नाही व्योमकेश.. तुझ्या बोलण्यातली नि घरच्यांची व्यथा व्यर्थ नाही. एकाच व्यक्तीला एकावेळी वेगवेगळी आयुष्ये जगावी लागतात.. सर्व ठिकाणी व्यवस्थित लक्ष देण्यासाठी हे सव्यापसव्य जरूरी आहेत .."

"आणि तुझ्या व्यक्तिगत आयुष्यासाठीही.."

व्याही व्योमकेश व्यंकटेश्वरांच्या व्याकरणाने व्यंकटेश वांगीकरांच्या आयुष्यातील अतिकामाचा बोळा निघाला नि आयुष्याचे पाणी व्यवस्थित वाहते झाले..

स

## सोपान सुख

सोपानरावांच्या सुखाची संकल्पना सुस्पष्ट आहे. सत्तेच्या सारीपाटावर सगळे दान सुयोग्य पडावे नि सुरक्षित मतदारसंघातून निवडून येऊन सत्तेचा सोपान सरसर चढून सर्वोच्च सत्तामुकुट सर करावा.. सत्तासंपादनाची गाडी सुसाट सुटावी.. सुख म्हणजे दुसरे काय असतं? त्या साठी सगळा अट्टाहास आणि सारे प्रयास आणि सायास. सरकारी गाडीच्या लाल दिव्याचा सुरम्य प्रकाश सगळे आयुष्य उजळून टाकू शकतो. त्या साठी सगळ्यांच्या खटपटी नि लटपटी, सत्तेच्या गुलालाचा मळवट भरण्याचे सौभाग्य लाभावे म्हणून सरीसृप प्राण्यांसारखे सरपटणे नि सेवाधर्माचे नाव घेत सत्तेच्या संरक्षक आवरणात स्वतःचा सर्वंकष विकास साधत तो लाल दिवा संपादन करणे.. श्रेष्ठींची सर्व तऱ्हेची सरबराई करणे.. सगळ्या सुरस कथा सोपानराव सावर्डेकर ऐकून होते. सत्ता सुंदरीच्या गळयात सोनसळी सरी घालावी, त्यांच्या सौभाग्यवती सावित्रीबाईंहून ही सहस्त्र पटींनी सुंदर आणि स्वर्गीय सुख देणारी सत्ता सुंदरी. आणि तिच्याच कृपाकटाक्षाकरता सगळे आसुसलेले सत्ताभिलाषी.

सोपानराव सावर्ड्यातील. सत्तारूढ पक्षाशी संकटकालात सोबत करत सर्वांगीण विकासाच्या मुद्द्यावर स्वार होत सत्तेची चव पहिल्यांदा चाखली नि तिची चटक लागली. सारीपाटावरच्या सोंगट्या हलवण्यात सोपानराव सफल होऊ लागले, तो सापशिडीचा खेळ खेळताना स्वतः शिडीवर चढत इतरांना सापाच्या तोंडी द्यायला लागले. सरस्वती सर्व देवतांत सुस्थिर देवी, तिच्याशी सख्य कधी जमले नाही, लक्ष्मी इतकीच चंचल सत्तादेवी.. सख्य जमले तरी कधी सोडून जाईल याची सदोदित चिंता करण्यात आयुष्य सरू लागले. सेवाभावाचा मुखवटा सदा सर्वदा चढवून मिरवणे सोपे नाही हे सत्तापराङ्मुखांस कसे समजणार.. सत्ता सुंदरीच्या सुंदर करकमलांनी विद्ध होणाऱ्यास तिचे सुकोमल बाहुपाश दूर करणे किती कठीण जात असावे.. येणारी निवडणूक कठीण .. सावर्डेकरांना सर्व बाजूंनी समस्त विरोधकांनी घेरले.. सत्तासुंदरीस सालानुसाल पकडून ठेवणे.. सर्रास सर्वांस सर्वकाळ जमते असे नाही .. यावेळीस सोपानराव सावर्डेकरांस ते साध्य होणार अथवा नाही .. सत्ता सिंहासनावर सोपानरावांस बसवून सत्तादेवी सत्तेवर त्यांना आरूढ करून सर्वोच्च सुखाचा साक्षात्कार घडवणार की नाही .. निवडणुकीच्या अर्जाचे सारे सोपस्कार पार पाडल्यावर सोपानराव आता याच चिंतेत सदा व्यग्र आहेत.

स्व

## अपुरी स्वप्नकथा

"हाय स्वीटी.. तू स्वतः?"

स्वप्नीलच्या बोलण्याने स्वाती दचकली. स्वीट स्वाती? स्वप्नीलची स्वामिनी? स्वतःवर खूश होऊन आपण स्वप्नात तर नाही.. असे वाटेपर्यंत तिच्या ध्यानात आले, तिचे स्वागत नाही, तर स्वप्नील स्टेजवर स्वगत म्हणत होता. स्वप्नील म्हणजे स्वरांचा राजा. पण स्वप्नीलची स्वारी आता अभिनयावर स्वार होऊन रंगमंचावर स्वैर सैर करायला निघालेली. गायन नि अभिनय या दोघांचे स्वरूप वेगळे. दोघे तसे स्वतंत्र विषय. स्वप्नीलच्या स्वभावात हे अभिनयाचे अंग स्वाभाविक नसले तरी अभिनयाच्या वारूवर स्वार होऊन रंगमचाचा स्वामी बनणे त्याच्या स्वच्छंद स्वभावात बसणारे होते. तसा स्वप्नील स्वयंसिद्ध होता. स्वावलंबी होता. पण या क्षेत्रात तो स्वतः स्वायत्त काम करू लागला तर ही इंडस्ट्री त्याला स्वाहा करायला मागेपुढे पाहणार नाही, हे इंडस्ट्रीचे स्वरूप स्वप्नील स्वप्नातही विसरू शकत नव्हता. त्यामुळे स्वतःला इकडील टायकून म्हणता येईल अशा श्री. स्वतंत्रकुमार यांच्या स्वाधीन करून टाकले होते. स्वर्गीय आवाजाच्या गायकाला एका फार्सिकल नाटकात उभे करण्याची कल्पना

स्वतंत्रकुमारांची. स्वार्थी स्वतंत्रकुमारांकडे आपले स्वातंत्र्य स्वेच्छेने गहाण टाकतोय स्वप्नील हे स्वच्छ दिसत होते. पण स्वातीला तरीही स्वप्नीलचे ते गद्य स्वर पण मोहून टाकत होते. स्वेतलानात या स्वप्नीलने काय पाहिले असावे? काही वर्षांपूर्वी स्वेटर घालून स्वप्नील स्वप्नाळू नजरेने का◌ॅलेजच्या का◌ॅरिडा◌ॅरमध्ये फिरे तेव्हा स्वाती स्वस्थ बसू शकत नसे. पण स्वेतलानाच्या स्वरयंत्रातून येणाऱ्या स्वरांची जादू स्वप्नीलवर आधीच पडलेली, स्वयं स्वप्नीलच तिच्यावर भाळलेला.. तेव्हा स्वातीकडे स्वप्नीलचे स्वप्न पाहण्याहून दुसरा मार्ग तरी कुठला होता?

स्वप्नील आता गायक नट होण्याची स्वप्ने पाहात होता. स्वेतलाना स्वरसम्राज्ञी होऊन स्वतंत्र करियर सांभाळत होती. तिच्या स्वार्थी स्वभावाने स्वप्नीलचा स्वप्नभंग होईल .. नि स्वातीचे स्वप्न साकार होईल .. असा स्वांत सुखाय विचार करत स्वाती समोरची तालीम पाहात स्वखुशीने बसली.. स्वप्नीलही स्वखुशीने कधीतरी तिच्याकडे पाहिल..

श

## शिंदेशाही

"तळहातावर शिर घेऊन लढणाऱ्या नि शरसंधानात शातिर नि शरीरात शतदा शर झेलण्यास तयार अशा शूरवीरांची गरज या शाही राजवटीला आहे. हे काम शामळूंचे नाही. शूरांचे आहे. राज्याची शीव ओलांडून शेजारील शत्रूप्रदेशावर शास्त्रशुद्ध पद्धतीने शिरकाव करतील, शत्रूचे शिरकाण करतील. शत्रूचा बीमोड करताना त्याची शेपूटही शिल्लक ठेवणार नाहीत. अशा शौर्याची गरज शाही राजवटीला आहे. ते शास्त्रशुद्ध शिक्षण देऊन आपले शागीर्दही तयार करतील. शत्रूचा शेवट करण्याची शिकवण शागीर्दांना देतील. शत्रूस कदापि शरण न जाणारे नि शत्रूरक्ताशिवाय ज्यांची तहान शमणार नाही अशा नि शत्रूस लीलया शह देत शाही राजवटीसमोर शत्रूस शुभ्र निशाण फडकवण्यास भाग पाडणाऱ्या अशा शूरवीरांशिवाय या शाही राज्याचा शकट एखाद्या शिळेसम अडकून पडेल. लोहासम शरीराच्या, असीम शारिरीक क्षमतेच्या, शांत व शीतल शिराच्या शूर जवानांच्या शौर्यातून हे राज्य घडेल. आणि अशा शूरवीरांच्या शौर्याला ही भूमी शतश: नमन करेल. हा शनवारवाडा अशा वीरांच्या प्रतीक्षेत आहे."

"वा! शामराव वा! शब्दफेक उत्तम. अशी की शिलांना फुटतील जीभा.. तुमच्या शब्दोच्चाराने व शब्दफेकीने हा शुष्क संवाद रसिक

शौकाने श्रवण करतील. तुम्हाला सांगतो, त्या शांताराम शिर्क्याच्या पोटात शूळ नाही उत्पन्न झाला तर नाव नाही लावणार शिवतरकरांचे. अभिनयात तुम्ही शुक्रताऱ्यासम शतदा चमकणार हे नि:संशय!"

"कसचं काय शिवरामपंत. शिवतरकरांच्या मनचा हा मोठेपणा. आम्ही शब्दसृष्टीशी खेळणारे. शांतिलाल शहा शेठच्या शे दोनशे पगारावर जगणारे. एक पै शिलकीत पडणार नाही.."

"ते सारे या शिवतरकरावर सोडा शामराव शिंदे. त्या शिंच्या शिर्क्याची एकाधिकारशाही मोडून शिंदेशाहीचा शुभारंभ होईल समजा. तुमच्याहून एक शतांशही अभिनय नसताना शिर्के शहेनशहा बनू पाहतोय. पण त्यास शह द्यायलाच हवा. शिंदे, शहाणे असाल तर शहाच्या शे दोनशेंवर सोडा पाणी आणि शेकड्यांत नाही तर लाखांत खेळायची तयारी करा.. त्यासाठीचा माझा शोध शामराव शिंदेंपर्यंत येऊन संपला.. शगुन म्हणून आमचा शिरीष शेळके तुम्हाला शंभर शेकड्यांचा धनादेश आगाऊ देईल. होऊन जाऊ देत शुभआरंभ.."

"पण.. यात शेवटी यश न आल्यास.. लोक शेण घालतील नि शोभा होईल.."

"शामराव, या शिवतरकराचा शब्द आहे. तुम्ही शांतपणे कामाला लागा.. शिंदेशाहीच्या उदयासाठी पहिलेच नाटक शिवतरकर नाट्यमंडळी प्रस्तुत सारे कसे शांत शांत.. प्रमुख भूमिका.. शामराव शिंदे.."

# ष

## कोष

पफबभम
अक्षरे ओष्ठ्य
सांगतो त्याची
गोष्ट एक स्पष्ट

एक सासू होती
अगदी खाष्ट
सांगती ज्येष्ठ
तिचीच गोष्ट

महिना असो
वैशाख वा जेष्ठ
श्रावण म्हणवूनी
उपासाचे कष्ट

सून तिची होई
अगदीच कष्टी
उपाशी पोटी घासे
भांडी ती उष्टी

'पो'टासाठी लावे
'पा'ठी कामाचे काष्ठ
'ब'रे कर काम
न हो 'फु'काची रूष्ठ

'भ'लते न लाड
म्हणे सासू ती खाष्ट
उपाशी सुनेस मिळे
खावया उष्टं

'म'ग काय करे ती
सासू सुनेत वितुष्ट
सून सोशिक बरी
सासू अगदीच दुष्ट

षटकर्णी झाली
सासू सुनेची ही गोष्ट
षडयंत्र म्हणत कुणी
सासू निष्कपटी श्रेष्ठ

होता होता आली
पौष महिन्याची षष्ठी
सुनेची बदलली
अगदीच दृष्टी

म्हणे नवऱ्यास चल
वसवू नवी सृष्टी
दूरदृष्टीने पाहू
करू प्रेमाची वृष्टी

दाखवून म्हणे
वाळून मुष्टी
उगाच कोणाची
का करावी तुष्टी

करूया बाळाचे
पालन पोषण
दोघांचे चालले
असले भाषण

सासूने ऐकले
असले संभाषण
घाबरली मनी
जरी कोरडी पाषाण

म्हणे उगाच नको

मनी धरू रोष
मानिते कशी
सारा माझाच दोष

मुलाच्या डोळयांत
वाहे पाणी उष्ण
म्हणे ही माझी राधा
नि मी यशोदेचा कृष्ण

'प'रत सांगतो नको
'फु'काचा संघर्ष
'ब'रे घर आपुले
'भ'ला आपलाच हर्ष

'मा'र्ग मग झाला
सुघड सुलभ निर्विष
न उरला रोष
विणला आनंद कोष

ह

## हरवलेल्या हत्तीची गोष्ट

हळदणकरांनी हत्ती हरवल्याची तक्रार केली नि एकच हलकल्लोळ झाला. हृदयनाथ हळदणकर हतबल होत डोक्यावर हात मारून बसले. हत्ती हरवला? असे कसे होईल?

"हल्ली काहीही होऊ शकते.." हळदणकरांचे शेजारी हरचेकर म्हणाले.

"हो ना! हत्ती ही काय साला हरवण्याची थिंग आहे? लाॅस्ट ॲंड फाउंडमदी इतके इयर्स होता पण ही हत्तीची गोस्ठ कधी होईल असे कदी नाय हर्ड साला.." मि.हॅरीस म्हणाले.

"हट .. हळदणकर टु कायपण म्हणते.. हाथी कोणी ग्हरात ठेवते काय?" श्री. होरमसजी.

"हळदणकर प्राजी.. हाथी इद्रही किद्र रख्ख दिया होगा.. तुस्सी ढूंढो.. या तो छिपा होगा किद्र.." हरप्रीतसिंग

"ई तो हमरे युपीमें भी नहीं होवत है.." हरकिशन.

"हुं कहुं छुं.. हत्तीला घरात ठेवतेच कशाला तुमी लोक.." हसमुखभाय

हळदणकरांच्या हरहुन्नरी शेजाऱ्यांकडून हरप्रकारची मते व्यक्त होऊ लागली.

"अहो, हातावर हात ठेऊन बसू नका. शोधा."

मिसेस हेमा हळदणकर ओरडल्या नि हळदणकर हतबलपणे उठून उभे राहिले.

"हत्ती तुज्या ग्हरमदी मावते कसा?" होरमसजी बोलले त्यावर हरकिशननी "हमरीभी समझमें नहीं आवत है.." म्हणत भर घातली.

"अहो, हरघडी मला हत्ती दिसतोय.. हटकून आठवण येणार .. हरीची."

हेमाबाई रडवेल्या होत म्हणाल्या.

"हरी? हा कोण नवीन?" हरचेकरांची उत्सुकता ताणली गेली.

"हॅ◌ेरी?"

"हॅरी नाही. हरी! आमच्या हत्तीचे नाव.."

"हॅत्तिच्या! हत्तीचे नाव?"

"मोठया हौसेने ठेवलेले.. हरी.. कुठे हरवला तू?"

"हळदणकर, हेमाबाई रडते. तू हरी अप. हार्ट मदी कायकाय होतं बायडी रडली तर. हीना रडली तर..

हीना मंजी बायडी माज्ही.." होरमसजी हीनाबायच्या आठवणीत हरखून बोलले.

हळदणकर हतबुद्ध होऊन विचार करू लागले. चाळीत एकच हलकल्लोळ माजला. कोलाहल नि हलचल पाहून ह.भ.प.हरीकृष्णबुवा हेरंबकर बाहेर आले. हत्ती हरवण्याबद्दलची सारी हकीकत परत हेरंबकरबुवांना ऐकवली गेली..

प्रसंग हेरून हेरंबकर हाती चिपळ्या घेऊन उभे राहिले..

"हे गेले.. हे हरविले

ह्यासी शोधे जो आपुले..

त्या आधी हे होतेचि

ह्याचि करावी खातरी!

हे मनुजा, तुझे हरवले काय.. शोधतोस काय.. तुज हवे काय? जे हवे त्याचा शोध म्हणजे हवेचा शोध. हवा ह्या ठिकाणी आहे.. तसा तुमच्या मनातील हत्ती सगळीकडे

आहे. ह्याचा शोध नको .. भगवंताचे हेचि सांगणे.. हेचि दान देगा देवा.. हत्तीचा विसर व्हावा..

तेव्हा हळदणकर.. आणि हेमाबाई.. हत्तीचा हा हट्ट सोडा.. हात दाखवून अवलक्षण करू नका.."

ह.भ.प. हेरंबकर म्हणाले .. तसे हळदणकरही 'हरेराम हरेराम.. राम राम हरे हरे..' म्हणायला लागले ..

हेमाबाई झोपेतून जागा झाल्या..

"अहो. हळदणकर.. हे काय? हद्द झाली.. ह्या झोपेतल्या भजनाला काय म्हणावे?"

हळदणकर जागे होत ह्यावर इतकेच म्हणाले, "हट्टी.. हेमा.. हट्टी नाही .. हत्ती, हेमा पाहिलास कुठे?"

ळ

## वळवळीचे गाणे

जळात दिसली
कसली वळवळ
वळवळ नाही
आहे सळसळ
कोणी म्हणे सर्प
झाली पळापळ
कोणास जळजळ
कोणास मळमळ
कोणास वाटे
त्यांची तळमळ
बालक कोणी
असे अवखळ
म्हणे पाहू मला
असेल गांडूळ
कुणी म्हणे

द्या मज गळ
पकडेन मी
काम हे फुटकळ
कुणी म्हणे हे न
इतके सरळ
साप असे तो
ओके गरळ
कोणी तो शूर
जास्तच अंमळ
बंद करा म्हणे
पाण्याचा नळ
वाहून जाईल
सगळं जळ
प्राण्याची होईल
मग पळापळ

कोणी आले हाती
घेऊन रूळ
पकडतो म्हणे
डाव्या हातचा मळ
कोणी म्हणे मी
वापरून बळ
थांबवीन याची
असली सळसळ
साळकाया जमल्या
तोंडी भिजे न तीळ
ऐकून आवाज जणू
बसली खीळ

स्तब्ध झाला प्रवाह
स्तब्ध झाले ते जळ
वाकूनि पाहती सर्व
काय ते बळबळं
डोक्यावर हात मारे
ते सगळे दळ
सर्व चिडीचुप्प
जेव्हा दिसे सुतळ!

## क्ष

### एक विविक्षित परिच्छेद

"क्षमा करा, क्षुधेचा डोंब पोटात उसळला असेल तर क्षीर सेवन करा.. क्षुब्ध होऊ नका. त्यातच सर्वांचे क्षेम आहे. या क्षणी आपल्या क्षमतेस क्षती पोहोचेल असे करून क्षणिक क्षुब्ध होण्याने काही साध्य होणार नाही. क्षितिजावरील क्षेत्रात शत्रू क्षेपणास्त्रांचे क्षेपण करण्याची शक्यता आहे. त्याच्या ताकदीस क्षीण आणि क्षुद्र समजण्याची चूक म्हणजे जखमेवर क्षार लेपन.. आपले क्षेत्ररक्षण हे आपले कर्तव्य आहे. आपल्या पिताजींनी केलेली चूक.. तिची क्षणचित्रे अजूनही डोळ्यांसमोरून हलत नाहीत.. त्या चुकांचे क्षालन करा. यातच सर्वांचे क्षेम आहे. ही तुमच्या क्षमतेची क्ष किरण चाचणीच समजा.चमकू देत क्षात्र तेजाने क्षत्रियाची समशेर आणि पोहोचू देत शत्रूस क्षती .. किती त्याची न बाळगावी क्षिती .."

ज्ञ

## सुज्ञ

असा कुणी सुज्ञ
अथवा अज्ञ
कथा ही मनोज्ञ
ऐकावी

एक राजा अन राज्ञी
समजे स्वतःस
राज्ञी नव्हे सम्राज्ञी
राजकन्या त्यांची ..

सम्राज्ञीचे काय
सोडे सदा आज्ञा
कुणाची न प्राज्ञा
तोडण्याची

सम्राज्ञीच्या मनी काय
कुणास न ज्ञात
सगळे अज्ञात
सम्राटासही

सम्राज्ञीस डरती
ऐशी सम्राज्ञीची ख्याती
ऐसी सगळ्यांची ज्ञाती
देशोदेशभरी

राज्ञी म्हणे राजास
करू यासाठी यज्ञ
बोलावू साधू तज्ञ
देशातील

राजास न मान्य
यज्ञाचा उपाय
सांग काही अन्य
म्हणे तो

सम्राट परेशान
देई विज्ञापन
आहे देशी तज्ज्ञ
ऐसा कोणी

असेल ज्ञानवंत
ऐसा कोणी मान्य
राजकन्येस देई ज्ञान
शांतपणे

आला एक झणी
म्हणे मजला ज्ञान
मजकडे ते विज्ञान
याचसाठी

ज्ञानचक्षूंनी घडवेन
ऐसी ज्ञानप्राप्ती
असे अनुज्ञाप्ती
जर मज

मजकडे ऐसे ज्ञान
कुणी ही अज्ञानी
होईल सज्ञान
झडकरी

राजा म्हणे मान्य
तुझ्या ज्ञानाने धन्य
करी यत्न बनून सुज्ञ
जमे कोणा न अन्य

जशी ही राजाज्ञा
नाही करेन अवज्ञा
करतो प्रतिज्ञा
म्हणे तो


तरूणाने वापरून ज्ञान
कसले उपाय न ज्ञात
काही महिन्यांच्या आत
सुधारे राजकन्या

तरूण म्हणे ऐका
महिमा ज्ञानाचा
ज्ञानेंद्रियांना फुटे वाचा
ज्ञानमार्गे

राजा आणि राज्ञी
संतुष्टले मनोमनी
ज्ञानचक्षूंची जीवनी
महती म्हणे


## डॉ. नितीन मोरे यांची ३४+२ प्रकाशित पुस्तके

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.





































डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे



राग दरबारी
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच


डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या



डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे






डॉ. नितीन मोरे
घरात


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो ऐका



डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
ई बुक
+ऑडिओपुस्तक
+व्हिडिओपुस्तक



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस


डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची
'परी' कथा
DON


Jackson!


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २
ढेप, औरंगजेब, अज्ञानेश्वर इ..


सुलट
डॉ. नितीन मोरे

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष
## डॉ. नितीन मोरे यांचे हे पस्तिसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३३), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत

पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१७), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(४) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), श्याम कुलकर्णी(२), किशोर कुलकर्णी, रामदास खरे, अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ‘‘इ’’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।